cmyk

## संपादकीय

### प्रदूषणच अधिक धोकादायक

स्वित्झर्लंडमधील दावोस हे जागतिक अर्थकारणाचे केंद्र म्हणून ओळखले जाते. तेथील आर्थिक परिषद, गुंतवणुकीचे करार व त्यातील करोडोंचे आकडे डोळे विस्फारणारे असतात. कुणी किती गुंतवणूक खेचून आणली, लक्ष्मीची पावले कशी उमटवली वगैरे चर्चा 'नेमेची होते गुंतवणूक' अशाच तऱ्हेची. तथापि, याच आर्थिक मंचावर जागतिक नाणेनिधीच्या माजी मुख्य अर्थतज्ञ गीता गोपीनाथ यांनी भारताला दिलेला.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२६८ | रविवार दि.२५ जानेवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### राज्य बालहक्क संरक्षण आयोग अध्यक्षांविनाच

मुंबई: बदलापूर येथील ४ वर्षीय चिमुरडीवर झालेल्या अत्याचारानंतर पुन्हा एकदा लहान मुलींच्या संरक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मात्र, शासनाला राज्य बालहक्क संरक्षण आयोगासाठी गेली वर्षभर अध्यक्ष व सदस्य मिळत नाहीत. यामुळे तीव्र संताप व्यक्त होत आहे. मुंबईसह राज्यात बालकांवरील अन्याय, अत्याचार आणि हत्येच्या घटना वाढत आहेत. असे असतानाही राज्य बालहक्क संरक्षण आयोगावर अध्यक्ष आणि सदस्यांची नियुक्तीकडे शासनाने कानाडोळा केला आहे. त्याचा कार्यकाळ ३ मे २०२५ रोजी संपला आहे. त्यानंतर नियुक्ती करण्यात आली नाही. त्यामुळे ८ ते ९ महिन्यांपासून ही पदे रिक्त आहेत. त्यामुळे पिडीत बालकांच्या पाल्यांनी न्याय कुणाकडे मागायचा, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

### मी चहावाला, ही तर मोदींची ड्रामेबाजी–खरगे

नवी दिल्ली: पंतप्रधान नरेंद्र मोदी अनेकदा त्यांच्या भाषणात स्वत:चा उल्लेख चहावाला असा करतात. लहान असताना आपण चहा विकला असल्याचे त्यांनी अनेकदा सांगितले आहे. मोदींचा हा दावा काँग्रेसने बऱ्याचदा खोडून काढल्याने त्यावरून मोठा राजकीय वादही निर्माण झालेला आहे. यादरम्यान काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी जुना मुद्दा उकरून काढत पंतप्रधान मोदी यांना लक्ष्य केले आहे. त्यांनी केलेल्या टीकेवर भारतीय जनता पक्षाने तीव्र आक्षेप घेतला आहे. त्यामुळे 'चहावाला' या मुद्यावरून सत्ताधारी व विरोधकांमध्ये पुन्हा एकदा जुंपली आहे. काँग्रेसच्या वतीने नवी दिल्ली येथे राष्ट्रीय मनरेगा कामगार परिषद आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमाला लोकसभेचे विरोधीपक्षनेते राहुल गांधी यांच्यासह काँग्रेसच्या अनेक दिग्गज नेत्यांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना पंतप्रधान मोदी 'चहावाला' असण्याच्या दाव्यावर खरगे टीका केली.

### फक्त मुंब्राच नाही तर संपूर्ण महाराष्ट्र हिरवा करु–जलील

ठाणे: ठाणे महापालिका निवडणुकीतील विजयानंतर एमआयएमच्या नगरसेविका सहर शेख यांच्या वक्तव्यावरून सुरू असलेल्या वादात आता पक्षाचे नेते इम्तियाज जलील यांनी उडी घेतली आहे. सहर शेखने जे वक्तव्य केले, त्याला माझा पूर्ण पाठिंबा आहे. सहरने माफी मागावी असे आम्हाला वाटत नव्हते, तिच्यावर दबाव आणला गेला, असा खळबळजनक दावा जलील यांनी मुंब्रा पत्रकार परिषदेत केला आहे. राज्यातील १२५ जागांवर आमचे अनेक हिंदू उमेदवार विजयी झाले आहेत. हा पराभव पचवणे विरोधकांना कठीण जात असल्याने ते आमची बदनामी करत आहेत. ''सहरच्या वक्तव्यावर रान पेटवणारे पोलीस नितेश राणे जेव्हा मशिदीत घुसून मारण्याची भाषा करतात, तेव्हा गप्प का असतात? त्यांच्यासाठी कायदा वेगळा आहे का? जर तोतला पुन्हा मुंब्र्यात आला, तर त्याची ब्लू फिल्म चौकात दाखवू, असे विधान करत त्यांनी किरीट सोमय्यांना अप्रत्यक्षपणे टोला लगावला आहे. आम्ही येणाऱ्या काळात संपूर्ण महाराष्ट्र हिरवा (एमआयएममय) करून दाखवू, असे ते म्हणाले.

# शेतकऱ्यांचा पुन्हा एकदा एल्गार!

## १२ फेब्रुवारीला देशव्यापी संप; कामगार, शेतकरी संघटनांची घोषणा

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**केंद्रीय कामगार संघटना आणि शेतकरी संघटना, केंद्र सरकारच्या कामगार, शेतकरी आणि लोकशाही विरोधी धोरणांच्या विरोधात एकवटल्या आहेत. त्यांनी १२ फेब्रुवारी रोजी अखिल भारतीय सर्वसाधारण संप पुकारला आहे. याबाबतच्या पूर्वतयारीसाठी तामिळनाडूतील त्रिची येथील उझावर संधाई येथे केंद्रीय कामगार संघटना आणि संयुक्त किसान मोर्चा यांच्याकडून परिषद घेण्यात आली.**

यावेळी सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स, ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस, इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस, हिंद मजदूर सभा, ऑल इंडिया सेंट्रल कौन्सिल ऑफ ट्रेड युनियन्स, एसकेएम यासारख्या प्रमुख कामगार संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी एकमताने सहा ठराव मंजूर करण्यात आले. यावेळी विविध संघटनांच्या नेत्यांनी चार कामगार कायदे मागे घेण्याची मागणी केली. यामुळे



सुमारे ८० टक्के कामगारांना कायदेशीर संरक्षणाच्या कक्षेबाहेर ढकलण्यात आले आहे. या कायद्यांच्या माध्यमातून मोठ्या देशी आणि बहुराष्ट्रीय भांडवलदारांना लाभ मिळवून देण्याचा उद्देश आहे. तसेच उद्योगांना कोणत्याही नियंत्रणाशिवाय व्यवसाय करण्याची मुभा दिल्याचा आरोप त्यांनी केला. नवीन बियाणे विधेयक शेतकऱ्यांसाठी हानिकारक असल्याचा दावा करत, त्यांनी केंद्र सरकारकडे सर्व शेतमालांसाठी किफायतशीर किमान आधारभूत किंमत निश्चित करण्याची मागणी केली. वीज निर्मिती आणि वितरणाचे खासगीकरण करण्याचा उद्देश असलेले वीज (सुधारणा) विधेयक रद्द करण्याचीही मागणी संघटनांच्या नेत्यांनी केली. तसेच महात्मा गांधींचे नाव मनरेगा योजनेतून हटवण्याच्या निर्णयावर निषेध नोंदवण्यात आला. यासह केंद्राच्या निधीत झालेली कपात ▶▶ पान २ वर


# आता वंदे मातरंम गायनावेळी उभे राहणे बंधनकारक

## गृह मंत्रालयाची उच्चस्तरीय बैठक

दिल्ली । वृत्तसंस्था

**केंद्र सरकार राष्ट्रीय गीत वंदे मातरंमला राष्ट्रगीत जन गण मन सारखा दर्जा देण्याचा आणि त्यासारखा प्रोटोकॉल तयार करण्याचा विचार करत आहे. एका वृत्तानुसार या महिन्याच्या सुरूवातीला केंद्रीय गृह मंत्रालयाने या मुद्द्यावर सविस्तर चर्चा करण्यासाठी एक उच्चस्तरीय बैठक घेतली होती. भारताच्या संविधानानुसार राष्ट्रगीत आणि राष्ट्रीय गीत या दोघांनाही एक विशेष सन्मान प्राप्त आहे. मात्र कायदेशीर आणि प्रोटोकॉलच्या बाबतीत दोन्हीमध्ये मोठे अंतर आहे.**

राष्ट्रगीत गात असताना उभे राहणे बधनकारक आहे. याचा अपमान केल्यास त्याला राष्ट्रीय सन्माम अपमान निवारण अधिनियम १९७१ अनुसार शिक्षा होते. तर राष्ट्रीय गात वंदे मातरंम गायनावेळी उभे राहणे किंवा एक विशिष्ठ मुद्रा मेंटेन करण्याबाबत कोणतेही कायदेशीर लिखित नियम नाहीत. सुत्रांच्या हवाल्याने सांगितले की, गृह मंत्रालयात झालेल्या बैठकीत या मुद्द्यावर चर्चा झाली. यावेळी राष्ट्रीय गीत गायन नियम आणि निर्देश आणि सन्मानाची पद्धत याबाबत चर्चा झाली. बैठकीत वंदे मातरंम गायनाची वेळ, स्थान आणि पद्धत याबाब स्पष्ट नियम तयार



करायला हवेत का? राष्ट्रीय गीत गाण्यापूर्वी राष्ट्रगीतासारखे उभे राहणे बंधनकारक करता येईल का? राष्ट्रीय गीताचा अपमान करणाऱ्यावर दंडात्मक आणि कायदेशीर कारवाई करता येईल का? यावर चर्चा करण्यात आली. केंद्र सरकार वंदे मातरंम बाबत वर्षभर उत्सव साजरा केला जात आहे. भाजपने काँग्रेसवर तुष्टीकरणाचे राजकारण केल्याचे म्हणत राष्ट्रीय गीताला कमी दर्जा दिल्याचा आरोप केला आहे. १९३७ मध्ये काँग्रेसच्या अधिवेशनावेळी वंदे मातरंम गीताची काही ▶▶ पान २ वर

# देवाभाऊ धनुभाऊला पावले

## परळी वैद्यनाथ येथील थर्मलच्या जागेत सोलार एनर्जी प्लांट उभा रहणार



परळी वै.। प्रतिनिधी

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांना विधानसभा सभागृहात दिलेल्या शब्दाची पूर्तता केली असून, परळी वैद्यनाथ येथील औष्णिक विद्युत केंद्राच्या निष्कासित झालेल्या संच क्रमांक १ ते ५ च्या जागेत मेगा सोलर प्रकल्प उभारण्यास शासनाने मंजुरी दिली असून पहिल्या टप्प्यात याठिकाणी ५० मेगा वॅट वीज निर्मिती क्षमता असलेला सोलर प्रकल्प उभारण्यात येत असून त्याची निविदा महानिर्मितीने प्रसिद्ध केली आहे.

परळी येथील औष्णिक विद्युत केंद्राच्या निष्कासित झालेल्या संच क्रमांक एक ते पाच च्या रिकाम्या जागेत ३५० मेगा वॅट वीज निर्मितीची क्षमता असलेला मेगा सोलर प्रकल्प उभारण्यात यावा अशी मागणी मागील अधिवेशनात धनंजय मुंडे यांनी विधानसभेत केली होती. त्यावर उत्तर देताना मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धनंजय मुंडे यांची ती मागणी मान्य करून लवकरच मेगा सोलर एनर्जी प्रकल्प ▶▶ पान २ वर

# लाडक्या बहीणचा हप्ता पुढील आठवड्यात?

पुणे । प्रतिनिधी

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या जानेवारी महिन्याच्या हप्त्याची लाभार्थी महिला आतुरतेने वाट पाहत आहेत. जानेवारी संपत आला तरीही अनेक महिलांच्या खात्यात रक्कम जमा झालेली नाही. जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा हप्ता पुढील आठवड्यात जमा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यापूर्वीही निवडणुकीच्या आधी हप्ता देण्यात आल्याचा अनुभव आहे. मात्र, याबाबत सरकारकडून अद्याप अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.**

राज्यात सध्या जिल्हा परिषद निवडणुकांची तयारी सुरू आहे. ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीआधीच लाडकी बहीण योजनेचा हप्ता महिलांच्या खात्यात जमा केला जाऊ शकतो, अशी चर्चा आहे. यापूर्वीही महापालिका निवडणुकांपूर्वी डिसेंबरचा हप्ता देण्यात ▶▶ पान २ वर

# जि.प.निवडणुकांतही भाजपचा बिनविरोध ट्रेंड!

## सिंधुदुर्ग जिल्ह्यात जिल्हा परिषदेचे तीन उमेदवार विजयी

सिंधुदुर्ग । प्रतिनिधी

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सत्ताधारी पक्ष यंदा बिनविरोध पॅटर्न राबवल्याचे पाहायला मिळत आहे. ऑपरेशन लोटसमध्ये भाजपने निवडणुकांच्या अगोदरच अनेक माजी आमदार आणि जिल्ह्यातील बडे नेते गळाला लावले. त्यानंतर, आता जिल्हापरिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत बिनविरोध पॅटर्न सुरू केल्याचे दिसून येत आहे. कारण सिंधुदुर्ग जिल्ह्यात जिल्हा परिषद निवडणुकांअगोदर भाजपच्या तीन



उमेदवारांची बिनविरोध वर्णी लागली आहे. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने पहिले खाते उघडले आहे.

राज्यात २९ महापालिका निवडणुकींचा निकाल समोर आला. त्यात भाजपचे वर्चस्व पाहायला मिळाले. या महापालिका निवडणुकीत पहिल्यांदाच बिनविरोध पॅटर्न चर्चेत आला. यात मतदानापूर्वीच महायुतीचे ६९ उमेदवार बिनविरोध निवडून आले. यावरून विरोधकांनी बरीच टीका केली. मात्र आता पुन्हा जिल्हा ▶▶ पान २ वर

# बायकोचा खून: हर्ट अटॅकचा केला बनाव

बीड । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील हातोला येथे शेतात सालगडी म्हणून काम करणाऱ्याने पत्नीचा डोक्यात काठीने वार करून निर्घृण खून केला. त्यानंतर तिचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाल्याचा बनाव रचून मृतदेह अंत्यसंस्कारासाठी गावी नेला. मात्र, बर्दापूर पोलिसांच्या सतर्कतेमुळे हा थरारक बनाव उघड झाला. सालगडी असलेल्या या व्यक्तीनेच आपल्या पत्नीचा खून केला अन तिचा मृत्यू हर्ट अटॅकने झाला, असा भास निर्माण केला. पण पोलिसांनी सुतावरून स्वर्ग गाठत आरोपी पतीला ताब्यात घेतले.

शीलाबाई सुरेश शेरफुले (वय ४५, रा. आलुरा, ता. देगलूर, जि. नांदेड) असे मृत महिलेचे नाव आहे. या घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. सुरेश शेरफुले हा हातोला येथील एका शेतकऱ्याच्या शेतात सालगडी म्हणून काम करण्यासाठी त्याच्या पत्नीसह राहत होता. मागील ३–४ दिवसांपासून तो गावाकडे जाऊ म्हणून पत्नीकडे आग्रह धरत होता, परंतु ती तयार नव्हती. याच कारणावरून दोघांत तीव्र वाद झाला असल्याची चर्चा आहे. रागाच्या भरात सुरेशने जाड भरीव काठीने शीलाबाईच्या डोक्यात एकामागून एक अनेक वार केले. या हल्ल्यात शीलाबाई रक्ताच्या थारोळ्यात कोसळल्या आणि त्यांचा जागीच ▶▶ पान २ वर

# मुंबईत बिहार भवन मग पाटण्यात महाराष्ट्र भवन का नाही–काँग्रेस



बुलढाणा । प्रतिनिधी

महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेस पक्षाला जनतेने राज्यात तिसऱ्या क्रमांकाचा पक्ष बनवले असून, सर्वात मोठा विरोधी पक्ष बनवले आहे. आता चंद्रपूर, लातूरसह इतर शहरातील महापौरपदासाठी काम सुरु आहे. चंद्रपूरमध्ये पक्षात कोणताच वाद नाही, विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार व खासदार प्रतिभा धानोरकर यांच्यात योग्य समन्वय असल्याचे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले.

बुलढाणा येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, चंद्रपूरमध्ये २७ नगरसेवकांचा काँग्रेसचा एकत्रित गट स्थापन करण्याची ▶▶ पान २ वर

# बनावट अपंग ओळखपत्राद्वारे प्रवास करणाऱ्यांवर होणार कारवाई

मुंबई । प्रतिनिधी

बनावट वैश्विक अपंग ओळखपत्र (यूडीआयडी) वापरून राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) प्रवास सवलतीचा लाभ घेणाऱ्या प्रवाशांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. अशा प्रकरणांमध्ये थेट गुन्हा दाखल करून बनावट ओळखपत्र जप्त करण्याचे निर्देश दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी राज्य परिवहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांना पत्र पाठवून दिले आहेत.

बनावट यूडीआयडीच्या आधारे ▶▶ पान २ वर

### प्रवाशांच्या ओळखपत्रांची तपासणी

या पार्श्वभूमीवर एसटी महामंडळाने यूडीआयडीची पडताळणी करण्यासाठी तांत्रिक यंत्रणा वापरण्याचे ठरवले आहे. वाहक, तिकिट तपासनीस आणि मार्ग तपासणी कर्मचारी यांनी यूडीआयडी विभागाचे अधिकृत मोबाईल ॲप वापरून प्रवाशांच्या ओळखपत्रांची तपासणी करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. या ॲपमध्ये प्रवाशाचा यूडीआयडी क्रमांक आणि जन्मतारीख नोंदवून ओळखपत्राची वैधता तपासली जाणार आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२३ जानेवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १२.५० क्विंटल | २,६१० | ३,८३० | ३,१८० |
| ज्वारी/हायब्रिड : ४२.०० क्विंटल | १,७०० | ४,००१ | ३,३९६ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १३६.५० क्विंटल | ४,४४१ | ७,८५१ | ७,३९१ |
| उडीद : ४.५० क्विंटल | ४,८५० | ६,३०० | ५,५७५ |
| बाजरी: २८.०० क्विंटल | २,१५१ | ३,२६१ | २,७५४ |
| मुग:०.५० क्विंटल | ६,००१ | ६,००१ | ६,००१ |
| सोयाबीन: १८४.०० क्विंटल | ४,९०० | ५,३०० | ५,१७१ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,००० | ६,७०० | ६,१३३ |

# बॉर्डर २ ची दमदार कामगिरी!

## १९९७ च्या बॉर्डर प्रमाणे सनी देओलचा 'बॉर्डर २' सुद्धा रसिकांना भूरळ घालणार

मुंबई । प्रतिनिधी

**पहिल्याच दिवशी 'बॉर्डर २' ने घवघवीत यश कमावले आहे. रणवीर सिंहच्या 'धुरंधर'चित्रपटाचे 'बॉर्डर २'ने रेकॉर्ड ब्रेक केले आहे. सनी देओलचा 'बॉर्डर २' चित्रपट २३ जानेवारी २०२६ ला थिएटरमध्ये रिलीज झाला आहे. चित्रपटाने पहिल्या दिवशी बक्कळ कमाई केली.'बॉर्डर २' चित्रपटाचे दिग्दर्शक अनुराग सिंह हे आहेत. 'बॉर्डर २'हा १९९७ ला रिलीज**



**झालेल्या'बॉर्डर ' चित्रपटाचा सिक्वल आहे. चित्रपटाने पहिल्याच दिवशी तब्बल ३० कोटी रुपयांची कमाई केली आहे. चित्रपटाने ॲडव्हान्स बुकिंगमध्येही बक्कळ कमाई केली.**

आता वीकेंडला चित्रपट किती कोटींचा व्यवसाय करणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. 'बॉर्डर २' चे ॲडव्हान्स बुकिंग कलेक्शन १७.५ कोटी रुपयांवर गेले. चित्रपट वीकेंडला १०० कोटींचा टप्पा पार करणार असल्याचे बोलले जात आहे. चित्रपटाने पहिल्याच दिवशी रणवीर सिंहच्या 'धुरंधर' चित्रपटाला मागे टाकले आहे. मीडिया रिपोर्टनुसार, 'धुरंधर' सिनेमाने पहिल्या दिवशी २८ कोटी रुपयांची कमाई केली होती. दोन कोटींनी 'बॉर्डर २'ने बाजी मारली आहे. ▶▶ पान २ वर

# जालना येथे तरुणाचा गोळीबार करून खून

## आरोपीला पाच दिवस कोठडी

जालना प्रतिनिधी

कदीम जालना पोलीस ठाणे हद्दीमध्ये शहरातील नूतन वसाहत भागात जिल्हा रुग्णालय रस्त्यावर शुक्रवारी (रात्री सुमारे ८.३० वाजता) थरारक गोळीबाराची घटना घडली. सदरील घटनेमध्ये एकाचा मृत्यू झाला आहे. स्कूटीवरून आलेल्या दोन इसमांनी चरण रायमल (वय २७) याच्यावर गावठी पिस्तूलातून अंधाधुंद गोळीबार केला. या गोळीबारात चरण रायमल गंभीर जखमी झाला. त्याला उपचारासाठी खाजगी रुग्णालयात हलवण्यात येत असतानाच रस्त्यातच त्याचा



मृत्यू झाला. याप्रकरणी आरोपींना न्यायालयाने पाच दिवसांचा पीसीआर दिला आहे.

याप्रकरणी अद्यापर्यंत आरोपीची पिस्तूल कदीम जालना पोलिसांना सापडली नाही.

घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल, पोलीस उपअधीक्षक अनंत कुलकर्णी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव तसेच यांच्यासह वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. आरोपींना ▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# प्रदूषणच अधिक धोकादायक

स्वित्झर्लंडमधील दावोस हे जागतिक अर्थकारणाचे केंद्र म्हणून ओळखले जाते. तेथील आर्थिक परिषद, गुंतवणुकीचे करार व त्यातील करोडोंचे आकडे डोळे विस्फारणारे असतात. कुणी किती गुंतवणूक खेचून आणली, लक्ष्मीची पावले कशी उमटवली वगैरे चर्चा 'नेमेची होते गुंतवणूक' अशाच तऱ्हेची. तथापि, याच आर्थिक मंचावर जागतिक नाणेनिधीच्या माजी मुख्य अर्थतज्ञ गीता गोपीनाथ यांनी भारताला दिलेला इशारा अतिशय गंभीर म्हटला पाहिजे. 'अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या आयात शुल्कापेक्षा भारतीय अर्थव्यवस्थेला प्रदूषणच अधिक धोकादायक ठरू शकते,' असे त्यांनी म्हटले आहे. त्यातील अर्थ समजून घ्यायला हवा. मुळात गीता गोपीनाथ यांचा अर्थशास्त्राचा अभ्यास दांडगा आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्या नावाला वेगळे वलय आहे. हे बघता प्रदूषणाच्या संकटाला सामोरे जाण्यासाठी आपण ठोस पावले उचलणार का, हा महत्त्वाचा मुद्दा होय.

जल, वायू, ध्वनी व कचरा प्रदूषण आज सर्वच देशांसमोरील मोठे आव्हान आहे. परंतु, अनेक देशांनी प्रदूषण मर्यादित ठेवण्यामध्ये यश मिळविले आहे. तथापि, भारतासारख्या विकसनशील देशात प्रदूषणाने अक्षरशः टोक गाठले आहे. दिल्ली, मुंबई, कोलकातासारख्या शहरांनी जगातील प्रदुषित शहरांमध्ये अग्रस्थान मिळविले आहे. याशिवाय पुणे, कानपूर, लखनौसह बहुतांश महानगरे प्रदुषणाच्या विळख्यात सापडल्याचे पहायला मिळते. हिवाळ्यामध्ये दिल्लीची हवा किती विषारी बनते, याचा प्रत्यय दरवर्षी येत असतो. स्वाभाविकच आरोग्याच्या समस्यांना नागरिकांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे इतर राज्यातील व परदेशातील नागरिक या काळात दिल्लीत येणे शक्यतो टाळतात. हे काही भूषणावह म्हणता येणार नाही. हवेसोबतच पाणी, कचरा आणि ध्वनी प्रदूषणाच्या बाबतीत देश म्हणून भारत आघाडीवर आहे. देशातील अनेक नद्या प्रदुषित झाल्या आहेत. कचऱ्याच्या ढिगाऱ्यांनी व दुर्गंधींनी शहरे व्यापून गेली आहेत. वाहनांचा धूर व गोंगाटात लोकांचे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य हरवले आहे. त्यामुळे प्रदूषण हे भारतासमोरील प्रमुख आव्हान असून, त्याचे अर्थव्यवस्थेवरील परिणाम कोणत्याही शुल्कापेक्षा गंभीर असतील, हा गीता गोपीनाथ यांनी दिलेला इशारा ही वस्तुस्थिती म्हटली पाहिजे. प्रदूषणाचे म्हणून अनेक परिणाम असतात. उत्पादकता, आरोग्यसेवेवरील खर्च व एकूण आर्थिक हालचालींवरही त्याचे परिणाम होतात. त्यामुळे आर्थिक वाढ मंदावण्यामागे हेही एक कारण असल्याची मांडणी त्या करतात. खरे तर खुले आर्थिक धोरण स्वीकारल्यानंतर भारताने सर्व स्तरावर मोठी प्रगती केली. मागच्या तीन ते साडेतीन दशकात भारताने साधलेली आर्थिक घोडदौड थक्क करायला लावणारी ठरते. अलीकडेच जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था म्हणून भारताने झेप घेतली आहे. ही बाब निश्चितच अभिमानास्पद म्हटली पाहिजे. परंतु, या सर्वाला प्रदुषणाची काळी किनार आहे, हे लक्षात घ्यावे. आर्थिक विस्तार व पायाभूत सुविधांच्या विकासात देश प्रगती करत असताना मोठ्या शहरांमध्ये प्रदूषण ही कायमस्वरूपी समस्या होऊन बसली आहे. भारतात दरवर्षी सुमारे १७ लाख मृत्यू हे केवळ प्रदूषणामुळे होतात. हे प्रमाण देशातील एकूण मृत्यूंपैकी १८ टक्के आहे, असे २०२२ च्या जागतिक बँकेच्या एका अहवालात म्हटले आहे. यातून प्रदूषणाचे संकट किती जीवघेणे आहे, हे दिसून येते. म्हणूनच पर्यावरणीय समस्यांचा मानवी आयुष्यावर आणि अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम लक्षात घेऊन या प्रश्नाकडे लक्ष देणे गरजेचे बनते. मागच्या काही वर्षांपासून प्रदूषणाच्या दाहकतेवर नियंत्रण मिळविण्यासाठी देशात विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. परंतु, अद्यापपर्यंत तरी त्या तोकड्याच असल्याचे पहायला मिळते. मात्र, आगामी काळात शासन, प्रशासन व जनता अशा सर्वांच्या सहभागातून या समस्येवर मात करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतील. प्रदूषणावर नियंत्रण नसेल, तर भारतीय अर्थव्यवस्थेचे संरक्षण करणेही कठीण होईल, असे गीता गोपीनाथ म्हणतात. ते खरेच आहे. म्हणूनच पर्यावरणाला प्राधान्य देऊन प्रदूषण नियंत्रणाचा मंत्र आपल्याला जपावा लागेल. एकीकडे प्रदूषणाचा प्रश्न ऐरणीवर असताना आगामी काळात जगावर पाणीसंकटाची टांगती तलवार असल्याचा मुद्दा संयुक्त राष्ट्र विद्यापीठाच्या अहवालातून समोर आला आहे. मानवाने गोड्या पाण्याचा अनिर्बंध उपसा केला आहे. त्यामुळे त्याची भरपाई होणे जवळपास अशक्य आहे. जगातील अनेक शहरे डे झिरोच्या दिशेने जात आहेत. इराणची राजधानी तेहरानमध्ये पाण्याची कमतरता निर्माण झाल्याने हे शहर अन्यत्र हलवण्याची वेळ येऊ शकते. बेंगळूर, चेन्नई, दिल्ली यांसारखी महानगरेही डे झिरोच्या जवळ असल्याचे यात म्हटले आहे. यातील गांभीर्यही समजून घेतले पाहिजे. जगातील एक चतुर्थांश लोकसंख्या जलाशयांवर अवलंबून आहे. तर निम्मी लोकसंख्या गरजांसाठी भूजलातील पाणी वापरते. परंतु, हे पाणी वेगाने संपत आहे. त्यामुळे अब्जावधी लोकसंख्येला वर्षातील किमान महिनाभर तीव्र पाणीसंकटाचा सामना करावा लागतो. मागच्या काही वर्षांत वातावरण बदल वा ग्लोबल वॉर्मिंगचा प्रश्न आ वासून उभा राहिला आहे. त्यामुळे ढगफुटी, दुष्काळ, उष्णतेच्या लाटा, थंडीच्या लाटा यांसारख्या आपत्ती वाढल्या आहेत. पर्यावरणाचे ऱ्हासचक्र असेच सुरू राहिले, तर ग्लोबल वॉर्मिंगचा धोका आणखी वाढू शकतो. परिणामी पाणीसंकटही गडद होऊ शकते. पाणी ही माणसाची मूलभूत गरज आहे. नद्या, जलाशयांकाठीच सर्व संस्कृत्या वसल्या, पोसल्या गेल्याचा इतिहास आहे. परंतु, याचा विचार न करता विकासाच्या नावाखाली माणसाने निसर्गाची जी ओरबाडणूक केली आहे, त्याचेच हे सर्व परिणाम आहेत. विकास नको, असे कुणी म्हणणार नाही. पण, त्यात तारतम्य हवे. नाशकातील तपोवनाच्या विषयात असेच तारतम्य सोडून वर्तन करण्याचा प्रयत्न झाला. पण, लोकांनी तो हाणून पाडला. हे बघता पर्यावरणावरील टॅरिफ टाळण्यासाठी भविष्यात सगळ्यांनाच संवेदनशील व सजग रहावे लागेल.

# एकही बंजारा तांडा विकासापासून वंचित राहणार नाही–अमरसिंह पंडित

## एक कोटी रुपये किंमतीच्या जांभळी तांडा रस्त्याचा भव्य शुभारंभ

**गेवराई । प्रतिनिधी**

**विधानसभा निवडणुकीत बंजारा समाजाने शिवछत्र परिवाराला साथ दिली, प्रचाराच्या काळात आम्ही विकासकामांचा शब्द दिला होता, तो पूर्ण करण्याचे काम आता सुरु झाले असून सभामंडप, अंगणवाडी, शाळा बांधकाम, रस्ते, विज, पाणी अशा मुलभूत सुविधांसंदर्भातील विकासकामे सध्या अनेक तांड्यांवर सुरु आहेत. तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायती मिळण्यासाठी प्रस्ताव दाखल केले आहेत. गेवराई विधानसभा मतदारसंघातील कोणताही बंजारा तांडा विकासापासून वंचित राहणार नाही असे प्रतिपादन माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी केले. जांभळी तांड्याला जोडणाऱ्या एक कोटी रुपये किंमतीच्या रस्ता कामाचा शुभारंभ करताना ते बोलत होते.**

जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत ठाकर आडगांव ते जांभळीतांडा या एक कोटी रुपये किंमतीच्या रस्त्याचे खडीकरण व मजबुतीकरण, मौजे कुंभेजळगाव, राजपिंप्री, जोडवाडी येथील ६० लक्ष रुपये किंमतीच्या बंधाऱ्याचे, मौजे जोडवाडी व सैदापूर येथील २३ लक्ष रुपये किंमतीच्या अंगणवाडी बांधकामासह ९७ लक्ष रुपये किंमतीच्या पाणीपुरवठा योजनेचा भव्य शुभारंभ शनिवार, दि.२४ जानेवारी रोजी माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगन्नाथ काळे, उपसभापती श्रीहरी पवार, माजी सभापती कुमारराव ढाकणे, जगन्नाथ काळे, जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक श्रीराम आरगडे, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष कालिदास नवले, माजी जिल्हा परिषद सदस्य साहेबराव पांढरे, किसान सेलचे तालुकाध्यक्ष सुभाष मस्के, बाजार समितीचे संचालक बाबुराव जाधव, खरेदी विक्री संघाचे सदस्य देवराव यमगर, सरपंच रविंद्र गाडे, विलास चव्हाण, परमेश्वर खरात यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी ठिकठिकाणी माजी आमदार अमरसिंह पंडित यांचे ग्रामस्थांनी भव्य स्वागत केले. अमरसिंह पंडित यांनी बंजारा समाजातील महिला व नागरिकांशी सुसंवाद साधला. विविध विकासकामांचे काम दर्जेदार करण्यात येतील त्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी चेअरमन शंकर पवार, विठ्ठल राठोड, जानू पवार, भानुदास महाराज राठोड, लहु सामजी, बाळु राठोड, सुभाष राठोड, जालिंदर राठोड,



रोहिदास राठोड, अनिल पवार, कचरु पवार, लहू पवार, मोतिराम राठोड, विलास पवार, संजय पवार,पांडुरंग राठोड, बन्सी जाधव, नंदकुमार पवार, सरपंच सिद्धेश्वर काळे, शेषेराव पवार, सुधाकर कोकाट, आरुण कोकाटे साळिकराम चव्हाण परमेश्वर कोकाट, संदिपान कोकाटे, एकनाथ काळे शिवनाथ काळे, अच्युत कोकाट, सतिश चव्हाण, कालिदास चव्हाण यांच्यासह ठाकर आडगाव, जांभळी तांडा येथील नागरिक तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकशाही बळकटीसाठी आदित्य पॉलिटेक्निकमध्ये मतदानाची शपथ

## आदित्य पॉलिटेक्निकमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव करून देणाऱ्या उपक्रमाने राष्ट्रीय मतदार दिन उत्साहात



**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरातील आदित्य पॉलिटेक्निक महाविद्यालयात २३ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिन लोकशाही मूल्यांची जाणीव करून देणाऱ्या विविध उपक्रमांसह उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये मतदानाचे महत्त्व पटवून देणे, लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभागासाठी प्रेरित करणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. लोकशाही बळकटीसाठी २२ कर्मचारी व १०० विद्यार्थ्यांना मतदानाची शपथ देण्यात आली.**

कार्यक्रमाच्या सुरुवातीस विद्यार्थ्यांना स्वच्छ, निर्भय, निष्पक्ष व जबाबदार मतदान करण्याची शपथ देण्यात आली. मतदान हा लोकशाहीचा कणा असून प्रत्येक नागरिकाने कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता आपला मतदानाचा हक्क बजावला पाहिजे, असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करण्यात आले. हा उपक्रम संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा व संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. यावर्षीची चू खपवळर चू तींश ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी मतदान जागरूकतेविषयी आपले विचार व्यक्त करत लोकशाही प्रक्रियेत युवकांचा सहभाग किती महत्त्वाचा आहे, हे अधोरेखित केले. कार्यक्रमात १८ वर्षांवरील विद्यार्थ्यांनी आपले नाव मतदार यादीत नोंदवावे, तसेच निर्भयपणे मतदान करून लोकशाही अधिक सक्षम करावी, असे आवाहन करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये मतदानाविषयी सकारात्मक वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रा. तांबे यांनी मानले. कार्यक्रमाचे नियोजन प्रा. गडदे यांनी केले असून शहाणे, निमगावकर व तांबे यांनी सहकार्य केले. शिक्षक शहाणे, सलीम, गडदे, तांबे, दुधाळ, राठोड यांच्यासह इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नेतृत्व डॉ. राहुल खडके यांनी केले. उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी संस्थेचे प्राचार्य, प्राध्यापकवर्ग व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

### लोकशाही बळकटीसाठी घेतलेली शपथ

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त विद्यार्थ्यांना स्वच्छ, निर्भय व निष्पक्ष मतदान करण्याची शपथ देण्यात आली. मतदानाद्वारे लोकशाही सक्षम करण्याची जबाबदारी युवकांची असून, कोणत्याही आमिषाला बळी न पडता मतदान करण्याचा निर्धार यावेळी विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.

### १८ वर्षांवरील युवकांना आवाहन

१८ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याने मतदार यादीत नाव नोंदवावे, तसेच लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले. चू खपवळर चू तींश या संकल्पनेद्वारे युवकांमध्ये मतदान जागरूकता वाढवण्यावर भर देण्यात आला.

### युवकांनीच लोकशाही मजबूत करावी– डॉ. आदित्य सारडा

आदित्य पॉलिटेक्निकचे संचालक डॉ. आदित्य सारडा म्हणाले की, लोकशाहीची खरी ताकद युवकांमध्ये आहे. मतदान हा केवळ हक्क नसून ती प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. आजचे विद्यार्थी उद्याचे जबाबदार नागरिक आहेत. त्यांनी निर्भय, निष्पक्ष आणि प्रामाणिक मतदान केल्यासच देशाची लोकशाही अधिक सशक्त होईल. 'चू खपवळर चू तींश' ही संकल्पना युवकांमध्ये मतदानाविषयी जागरूकता निर्माण करणारी असून अशा उपक्रमांमुळे लोकशाही मूल्ये अधिक बळकट होतील.

# जि.प.प्रा.शाळा ऊपळीत आनंदाची जत्रा; बाल आनंदनगरी संपन्न

**वडवणी । प्रतिनिधी**

**जि. प. प्राथमिक शाळा, ऊपळी येथे बाल आनंदनगरी मोठ्या उत्साहात पार पडली. चिमुकल्यांच्या कल्पकतेला व्यासपीठ मिळावे आणि त्यांच्यात व्यावसायिक कौशल्याची रुजवण व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता.**

लहानपण देगा देवा... ऊपळी शाळेत भरली आनंदाची नगरी! शालेय जीवनात अभ्यासासोबतच अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद काही वेगळाच असतो. आज आपल्या जि. प. प्राथमिक शाळा, ऊपळी येथे बाल आनंदनगरी उत्साहात साजरी झाली. विद्यार्थ्यांनी लावलेले स्टॉल्स, खमंग खाद्यपदार्थ आणि गावकऱ्यांचा मिळालेला उदंड प्रतिसाद यामुळे संपूर्ण शालेय परिसर चैतन्याने न्हाऊन निघाला होता. शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांनी एकत्र येत या उपक्रमाची रंगत वाढवली. यावेळी गावातील सरपंच सचिन होळकर,उपसरपंच विनायक शेळके,ऊपळी हायस्कूल ऊपळीचे मुख्याध्यापक बडे सर,जि.प.प्राथमिक शाळाचे मुख्याध्यापक राठोड सर,ऊर्दू शाळेचे मुख्याध्यापक जावेद सर,सौंदरमल सर, माने सर, आवंतकर सर,दुधाळकर सर,ठोंबरे मॅडम, घुमरे मॅडम, इंगोले मॅडम,तयेब शेख, शाम ईचके,बंडु सोगे, पत्रकार अतुल राऊत, शिक्षण समिती अध्यक्ष प्रकाश आजबे,शेख फारुख,सचिन दुधाने,व गावातिल नागरिक, पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचा आणि खेळांचा मनमुराद आनंद लुटला. सर्वांच्या उपस्थितीने हा सोहळा खऱ्या अर्थाने आनंदोत्सव ठरला! ऊपळी येथील जि. प. प्राथमिक ( ) शाळेत शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध खाद्य पदार्थाचे स्टॉल लावून बाल आनंद मेळावा साजरा केला. कमाई सप्ताहाअंतर्गत विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञाना बरोबरच, व्यावहारिक, आर्थिक बाबीची जाण व्हावी, समाजाचे ज्ञान मिळावे, बिन भिंतींच्या शाळेतील ज्ञान प्राप्त व्हावे, व्यावहार कुशलता कळावी यासाठी जिल्हा परिषद शाळेने खरी कमाई योजनेअंतर्गत शालेय विद्यार्थ्यांच्या बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी ( ) स्वतः च्या घरूण चविष्ट व चटकदार खाद्यपदार्थ बनवून आणले होते. स्टॉलची मांडणी, विविध पदार्थाची विक्री, खरेदी व विविध पदार्थाचा आस्वाद घेण्याचा आनंद मुलांनी लुटला. आनंद मेळाव्याला चिमुकल्या पासून ते अबाल वृद्धांनी या मेळाव्यात हजेरी लावली होती. विद्यार्थ्यांनी आणलेल्या सर्व खाद्य पदार्थाची गावकऱ्यांनी अतिशय उत्साहात खरेदी केल्या व खाद्य पदार्थाची विक्री झाल्याने चिमुकल्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता.सहभागी सर्व विद्यार्थी आणि सहकार्य करणाऱ्या पालकांचे व शालेय शिक्षण समिती अध्यक्ष उपअध्यक्ष यांचे मनःपूर्वक आभार!

# पान १ वरून...

### शेतकऱ्यांचा पुन्हा

आणि आर्थिक भार राज्यांवर ढकलण्याच्या तरतुदीवर परिषदेने तीव्र नाराजी व्यक्त केली. या परिषदेत विमा क्षेत्रात १०० टक्के थेट परकीय गुंतवणुकीला परवानगी देण्याचा निर्णय मागे घेण्याची विनंती करण्यात आली. येत्या काही महिन्यांत अधिक तीव्र आंदोलन केले जाईल, याचा इशारा देण्यासाठीच हा सर्वसाधारण संप असल्याचा इशारा कामगार संघटनांच्या नेत्यांनी दिला आहे.

---------------

### देवाभाऊ धनुभाऊला

उभा करण्याचा शब्द दिला होता. या सोलार निर्मिती प्रकल्पाच्या उभारणीमुळे वीज निर्मितीसह परळी व परिसरात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती देखील होणार असून हा प्रकल्प परळीच्या विकासात एक मैलाचा दगड ठरणार आहे. पहिल्या टप्प्यात ५० मेगा वॅट वीज निर्मिती क्षमता असलेल्या संचाची उभारणी करण्यात येणार असून याबाबतची निविदा महानिर्मितीने प्रसिद्ध केल्याने लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी ऊर्जामंत्री तथा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे समस्त परळीकरांच्या वतीने आभार मानले आहेत.

----------

### आता वंदे मातरंम गायनावेळी

कडवी हटवण्यात आली होती. भाजपने आरोप केला की, यामुळेच विभाजनाची बिजे रोवली गेली. काँग्रेसने भाजपवर इतिहासाची मोडतोड करून तो सांगितला जात आहे. पश्चिम बंगालच्या निवडणुकीच्या तोंडावर या मुद्द्याला हवा दिली जात आहे. वंदे मातरंम बाबत सध्या न्यायालयात देखील लढा सुरू असून विशेष म्हणजे केंद्र सरकारने २०२२ मध्ये सर्वोच्च न्यायालयात राष्ट्रीय गीताबाबत कोणतेही दंडात्मक तरतूदीबाबतचे निर्देश देण्यात आलेले नाहीत. बंकीम चंद्र चट्टोपाध्याय यांनी लिहिलेले वंदे मातरंम हे स्वदेशी आंदोलनादरम्यान स्वातंत्र्य चळवळीचे एक स्लोगन झाले होते. आता सरकार या गीताला त्याची गतवैभव मिळवून देणार असल्याचा दावा करत आहे.

-----------

### बायकोचा खूनः हर्ट

मृत्यू झाला. त्यानंतर सुरेशने हा खून पचवण्यासाठी परिसरातील लोकांना आणि गावाकडे नातेवाईकांना शीलाबाईचा हृदयविकाराने मृत्यू झाल्याचे खोटे सांगितले. गुन्हा लपवण्यासाठी सुरेशने तातडीने एक क्रुझर गाडी भाड्याने केली आणि मृतदेह घेऊन थेट देगलूर तालुक्यातील आलुरा गाठले. मात्र, बर्दापूर पोलिसांना या संशयास्पद मृत्यूची गुप्त माहिती मिळाली. बर्दापूर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक कांबळे यांनी वेळ न घालवता देगलूर पोलिसांशी संपर्क साधला. देगलूरचे पोलीस उपनिरीक्षक गोपाळ सूर्यवंशी यांनी तातडीने आलुरा गाव गाठले. तिथे शीलाबाईच्या माहेरच्या लोकांनाही डोक्यावरील जखमा पाहून संशय आला होता. पोलिसांनी अंत्यसंस्कारापूर्वीच मृतदेह ताब्यात घेऊन पती सुरेशला ताब्यात घेतले.

---------

### जि.प.निवडणुकांतही

परिषद, पंचायत समिती निवडणुकीत हाच ट्रेंड दिसून येत आहे. सिंधुदुर्गात पंचायत समितीच्या निवडणुकीत भाजपाच्या तीन उमेदवार निवडून आले आहेत. पालकमंत्री नितेश राणे यांच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात भाजपचे तीन उमेदवार बिनविरोध झाल्याने कार्यकर्त्यांमध्ये प्रचाराचा उत्साह वाढला आहे. तसेच शिंदेसेनेचे मंत्री उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या बालेकिल्ल्यातून पद्मजा कांबळे यांची बिनविरोध निवड झाली आहे. राज्यातील शिवसेनेचा हा पहिलाच उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे. यावरून विरोधकांनी यापूर्वीच जोरदार आवाज उठवला होता. त्यामुळे आता जिल्हा परिषदांमध्येही बिनविरोध मुद्यावरून वातावरण तापण्याची शक्यता आहे.

-------------

### लाडक्या बहीणचा

आला होता. त्यामुळे यावेळीही निवडणुकीआधी पैसे मिळण्याची शक्यता महिलांकडून व्यक्त केली जात आहे. जिल्हा परिषद निवडणुकांचे निकाल ७ फेब्रुवारीला जाहीर होणार आहेत. त्यामुळे फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात, साधारण १० दिवसांत महिलांच्या खात्यात १५०० जमा होऊ शकतात, असे सांगितले जात आहे. मात्र, याबाबत सरकारकडून अजून अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. दरम्यान, काही महिलांचा लाडकी बहीण योजनेचा लाभ अलीकडे बंद करण्यात आला आहे. ई-केवायसी करताना प्रश्न नीट न समजल्याने काही महिलांनी चुकीची माहिती भरली होती. त्यामुळे त्यांना अपात्र ठरवण्यात आले. ही अडचण दूर करण्यासाठी सरकारने आता प्रत्यक्ष तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. आता अंगणवाडी सेविका महिलांच्या घरी जाऊन कागदपत्रांची तपासणी करणार आहेत. पात्र महिलांना आपली चूक सुधारण्याची संधी दिली जाणार आहे. त्यानंतर त्यांचा लाभ पुन्हा सुरू केला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे अनेक लाडक्या बहिणींना दिलासा मिळणार आहे.

-----------------

### बनावट अपंग ओळखपत्राद्वारे

एसटीच्या सवलती घेतल्याचे आढळल्यास, संबंधित व्यक्तीविरोधात दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच बनावट ओळखपत्र तत्काळ जप्त करून त्याची माहिती दिव्यांग कल्याण विभागाला कळवण्याचेही आदेश देण्यात आले आहेत.सोलापूरमध्ये उघडकीस आलेल्या बनावट अपंग ओळखपत्र प्रकरणानंतर राज्यभर ही कारवाई राबवली जाणार आहे. पात्र दिव्यांग व्यक्तींनाच सवलतींचा लाभ मिळावा आणि गैरवापर थांबवावा यासाठी यूडीआयडीची तांत्रिक पडताळणी करून कठोर अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एसटीतील सर्व वाहक, पर्यवेक्षक आणि तपासणी कर्मचाऱ्यांना त्यांच्या मोबाईलमध्ये यूडीआयडी ॲप डाऊनलोड करून कर्तव्यावर असताना प्रत्येक दिव्यांग प्रवाशाची पडताळणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. एकंदरीत, बनावट यूडीआयडीद्वारे सवलती लाटणाऱ्यांवर कडक कारवाई करून पात्र दिव्यांग व्यक्तींचे हक्क सुरक्षित ठेवण्याचा सरकारचा हा निर्णय असल्याचे स्पष्ट होत आहे.

-----------

### मुंबईत बिहार भवन मग पाटण्यात

प्रक्रिया सुरु असून शिवसेना (उबाठा), वंचित बहुजन आघाडी व मित्रपक्षांनी काँग्रेसबरोबर यावे यासाठीही चर्चा सुरु असून चंद्रपूरमध्येही काँग्रेसचा महापौर बनवण्याचा प्रयत्न सुरु आहे. परभणी महानगरपालिकेत काँग्रेस शिवसेना (उबाठा)पक्षाला पाठिंबा देत आहे, तर चंद्रपुरात त्यांनी काँग्रेसला पाठिंबा द्यावा यासाठी चर्चा सुरु आहेत. विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार व खासदार प्रतिभाताई धानोरकर यांच्या नेतृत्वाखाली नगरपालिका निवडणुकीत चंद्रपूर जिल्ह्यात काँग्रेस पक्षाला चांगले यश मिळाले आहे. या दोन्ही नेत्यांमध्ये समन्वय व संवादात कोणतीही अडचण नाही व पुढेही अडचण येणार नसल्याचे सांगितले. यावेळी बोलताना हर्षवर्धन सपकाळ यांनी सवाल केला की, भारतीय जनता पक्ष हा जात, धर्म, भाषा, प्रांत याचा राजकारणासाठी वापर करत आहे. आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी असे द्वेष पसरवण्याचे काम भाजपा करत असते, त्याच मानसिकतेतून मुंबईत बिहार भवन बांधण्याचा घाट घातलेला दिसत आहे. मुंबईत बिहार भवन बांधण्याबरोबरच पाटण्यात महाराष्ट्र भवन बांधण्याचे त्यांनी जाहीर केले असते तर दोन राज्यात सांस्कृतिक आदान प्रदान होत आहे असे दिसले असते. पण भाजपाला फक्त वाद निर्माण करायचे आहेत आणि त्यातूनच बिहार भवनचा मुद्दा पुढे आणला असल्याची टीकाही यावेळी केला. पुढे बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, राज्यात गुंडागर्दी, महिला अत्याचार वाढत आहेत, हे चिंताजनक असून हे गृहविभागाचे अपयश आहे. राज्याला पूर्णवेळ गृहमंत्री नसल्याने त्याचे परिणाम महाराष्ट्राला भोगावे लागत आहेत. बदलापूरची घटना महाराष्ट्रासाठी लाजिरवाणी आहे. भाजपा सरकारने अशा घटनांना आळा घालण्यासाठी ठोस भूमिका घेणे गरजेचे आहे. पण पोक्सो गुन्ह्यातील आरोपीलाच भाजपा बदलापूरमध्ये स्विकृत नगरसेवक बनवते, यातून लहान मुलींवरील अत्याचाराप्रकरणी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री व भाजपा सरकार किती असंवेदनशील आहे हे दिसते, अशी टीकाही यावेळी केला.

-------------

### जालना येथे तरुणाचा गोळीबार

पकडण्यासाठी विविध पथके तयार करून शोधमोहीम सुरू करण्यात आली. दरम्यान, शनिवारी पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास जालना अंबड रोडवरील काजळा फाटा परिसरात पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या दोन संशयितांचा पाठलाग करून पोलिसांच्या पथकाने त्यांना शिताफीने पकडले. ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे अजय विजय आमलेकर आणि अमन शैलेंद्र धिल्लोड (दोघेही रा. मातोश्री लॉनजवळ, जालना) अशी आहेत. या दोन्ही आरोपींना न्यायालयामध्ये हजर केले असता सदरील आरोपींना पाच दिवसाचा पोलीस कोठडी देण्यात आली. यासंदर्भात खूनाचे कारण सांगण्यास कदीम जालना पोलिसाकडून नकार दिला असून याबाबत तपास सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

--------------

### बॉर्डर २ ची दमदार

चित्रपटातील 'घर कब आओगे' गाणे सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. 'बॉर्डर २' पाहण्यासाठी थिएटर हाफुसफुल दिसत आहेत. चित्रपटात सनी देओल, वरुण धवन, परमवीर सिंह चीमा, दिलजीत दोसांझ, अहान शेट्टी, सोनम बाजवा, मेधा राणा आणि मोना सिंग झळकले आहेत. चित्रपटाची कथा १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धाच्या पार्श्वभूमीवर आधारित आहे.

-------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

रविवार दि. २५ जानेवारी २०२६



## थोडक्यात



### चौसाळा येथील गुरुदत्त शाळेत विविध क्रीडा स्पर्धेचे आयोजन

चौसाळा । प्रतिनिधी

येथील गुरु महाराज शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा गुरुदत्त शिक्षण संस्थेत प्रजासत्ताक दिनानिमित्त शाळेत विविध स्पर्धा आयोजन करण्यात आले. सदर क्रीडा स्पर्धांना शुभारंभ शाळेचे मुख्याध्यापक श्रीमंत चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले या स्पर्धेच्या शुभारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार एनटी वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती सदर क्रीडा स्पर्धेत कबड्डी खो-खो क्रिकेट गोळा फेक लांब उडी सह बाल महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले या स्पर्धात संघनायक घोडके सर यांच्यासह शाळेतील क्रीडा स्पर्धाच्या संघनायक शिवाली जोगदंड गीतांजली जोगदंड यांनी आपली जबाबदारी व्यवस्थितरित्या पार पाडली या स्पर्धेत शारीरिक शिक्षक जाधव मॅडम साबणे मॅडम लिमकर सर होंडे सर मोठे सर आदीने भाग घेऊन क्रीडा स्पर्धा यशस्वी केल्या

### बौद्धिक संपदा अधिकार,पेटंट आणि डिझाईन या विषयावर ऑनलाइन राष्ट्रीय कार्यशाळा

पाटोदा । प्रतिनिधी

जयभवानी महाविद्यालय पाटोदा आणि बलभीम महाविद्यालय बीड येथील अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने बौद्धिक संपदा अधिकार, पेटंट आणि डिझाईन फायलिंग या विषयावर एक दिवसीय ऑनलाईन राष्ट्रीय कार्यशाळा संपन्न झाली.या कार्यशाळेचा उद्देश बौद्धिक संपदा हक्कांबाबत जनजागृती करणे हा होता.या कार्यशाळेमध्ये राजीव गांधी राष्ट्रीय बौद्धिक संपदा अधिकार व्यवस्थापन संस्था नागपूर येथील सहाय्यक संचालक श्री. कुमार राजू यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेमध्ये त्यांनी , पेटंट, औद्योगिक रचना, ट्रेडमार्क, भौगोलिक संकेतांक आणि कॉपीराइट या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी कायदेशीर बाबी सोप्या भाषेत मांडल्या. या कार्यशाळेचे अध्यक्ष बलभीम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष उंदरे सर हे होते. या कार्यशाळेमध्ये प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर, प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे सर, उपप्राचार्य डॉ. बाबासाहेब कोकाटे सर, आक्यूएसी समन्वयक प्रा. विनोद किर्दक यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यशाळेचे सूत्रसंचलन आक्यूएसी समन्वयक डॉ. अनिल चिंधे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. सोमेश्वर बाबर यांनी केले.पाहुण्याचा परिचय डॉ. गोवर्धन वायसे यांनी करून दिला. या कार्यक्रमाचे आभार प्रा.डॉ. शिवाजी काकडे यांनी मानले. या कार्यशाळेमध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी, संशोधक व प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रश्नोत्तर सत्रामुळे सहभागींच्या शंका निरसनास मदत झाली. अशारीतीने ही कार्यशाळा नवकल्पना व संशोधनाला चालना देणारी ठरली.

### चंदल आडगांवकर यांचे आज गायन

अंबाजोगाई । प्रतिनिधी



येथील संगीत साधना मंचच्या वतीने शास्त्रीय संगीत साधक व रसिकांसाठी मासिक सभा होणार असून रविवार २५ जानेवारी रोजी होणाऱ्या सभेत छत्रपती संभाजीनगर येथील प्रख्यात गायिका चंदल आडगांवकर यांचे स्वतंत्र गायन होणार आहे संवादिनीवर विश्वजित धाट हे तर दिनेश डोळे तबल्यावर साथसंगत करतील आदर्श वसाहत भागातील कपिल गणेश मंदीर येथे सकाळी दहा वाजता होणाऱ्या या मासिक संगीत सभेचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## जन्म प्रमाणपत्र प्रकरणात मोठा दिलासा
## औरंगाबाद खंडपीठात रिट, पोलिसांना नोटीस

गेवराई । प्रतिनिधी

जन्म प्रमाणपत्रांच्या अर्जातील किरकोळ त्रुटींमुळे गुन्हा दाखल झालेल्या प्रकरणात अन्यायग्रस्त नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी माजी नगरसेवक सय्यद एजाज इफ्तेखार अहमद यांच्या नेतृत्वाखाली मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. या याचिकांद्वारे गुन्हा रजिस्टर क्रमांक २५६/२०२५ पोलिस स्टेशन गेवराई मधील एफआयआर रद्द करण्याची मागणी करण्यात आली असून, न्यायालयाने पोलिस प्रशासनाला नोटीस बजावण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणात सय्यद एजाज आणि अँड. काझी मुखीमोद्दीन यांची भूमिका निर्णायक ठरली असून, त्यांच्या प्रयत्नांमुळे शेकडो नागरिकांना दिलासा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



प्रकरणाची सुरुवात गेवराई तहसील कार्यालयात झाली. येथे जन्म प्रमाणपत्रांसाठी अर्ज दाखल करणाऱ्या नागरिकांनी आधार कार्ड आणि शाळेच्या टीसीमधील जन्मतारखेच्या तफावती दूर करण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया अवलंबली होती. मात्र, तहसीलदारांनी संचिकांची फेरतपासणी न करता आणि अर्जदारांना बाजू मांडण्याची संधी न देता थेट गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. यानुसार गेवराई पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदवण्यात आला.

सुरुवातीला १७ आरोपी करण्यात आले, पण तपास अधिकारी सहायक पोलिस निरीक्षक दीपक लंके यांनी किरकोळ त्रुटींवरून असे की ,अर्जावर सही नसणे, नोटरी शपथपत्र नसणे आधार कार्ड व टिसी मधील जन्म तारखेतील तफावत असने अशे जवळपास २०० लोकांना ४१ए सीआरपीसी अंतर्गत नोटिसा बजावल्या आणि अटक फॉर्म भरून घेतले. हे सर्व दुरुस्तीयोग्य असतानाही पोलिसांनी अतिउत्साह दाखवल्याचा आरोप आहे.

या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी माजी नगरसेवक सय्यद एजाज यांनी पुढाकार घेतला. ते म्हणाले, नागरिकांनी ओळख लपवण्याचा कधीही प्रयत्न केला नाही. तरीही त्यांना आरोपी ठरवणे हे अन्यायकारक आहे. मी सर्व पीडितांना एकत्र करून न्याय मिळवण्यासाठी प्रयत्न करत आहे.सयय्द एजाज यांच्या नेतृत्वाखाली पीडितांनी एकजूट दाखवली आणि क्रिमिनल अर्ज क्रमांक ४६६१/२०२५ व ५०४८/२०२५ दाखल केले. यात ज्येष्ठ विधिज्ञ अँड. सुदर्शन साळुंके आणि अँड. महेंद्र गंडले यांनी अभ्यासपूर्ण युक्तिवाद केला. न्यायालयाने प्रकरणाची गांभीर्य ओळखून पोलिसांना म्हणणे मांडण्यासाठी नोटीस बजावली.

या संपूर्ण प्रक्रियेत अँड. काझी मुखीमोद्दीन सैदोद्दीन यांचा कायदेशीर सल्ला महत्त्वपूर्ण ठरला. ते म्हणाले, हे प्रकरण किरकोळ त्रुटींवरून नागरिकांना गुन्हेगार करण्याचे उदाहरण आहे. आम्ही याचिकेत सर्व पुरावे सादर केले असून, न्यायालयाने आमच्या बाजूला लक्ष दिले आहे. काझी यांच्या मार्गदर्शनामुळे याचिका दाखल करण्यात पीडितांना मोठी मदत झाली. त्यांच्या अनुभवामुळे प्रकरण न्यायालयात प्रभावीपणे मांडले गेले. या घटनेने प्रशासकीय यंत्रणेच्या मनमानी कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. सय्यद एजाज आणि काझी मुखीमोद्दीन सैदोद्दीन यांच्या प्रयत्नांमुळे पीडितांना न्याय मिळेल, अशी आशा आहे. प्रकरणाची पुढील सुनावणी ६ मार्च २०२६ रोजी होणार आहे.

## जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भामचंद्र, भंडारा आणि घोरडा या डोंगरांचे अस्तित्व धोक्यात

वडवणी । प्रतिनिधी

जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भामचंद्र, भंडारा आणि घोरडा या डोंगरांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. वाढते अतिक्रमण आणि उत्खननाविरुद्ध लढा देण्यासाठी संघटीत व्हा, २५ जानेवारी रोजी वडवणी येथे होणाऱ्या मेळाव्यासाठी सर्व वारकरी बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन अ.भा. मराठा महासंघ आध्यात्मिक आघाडीचे राज्य प्रवक्ता ह.भ.प. श्रीराम महाराज शेळके व आध्यात्मिक आघाडीचे महाराष्ट्राचे नेते बब्रुवान शेंडगे यांनी केले.



संतभूमी संरक्षक संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष मधुसूदन पाटील महाराज यांचे महाराष्ट्रात जनजागृती अभियान सुरू असून संत तुकाराम महाराजांची श्रीक्षेत्र देहु जवळील तपोभूमी भामचंद्र डोंगराचा बिल्डर व एमआयडीसी द्वारे होत असलेल्या विध्वंसावर शासनकृत सन २०११ ला राज्य संरक्षित स्मारक म्हणून काढलेल्या संविधानिक अधिसूचनेच्या अंमलबजावणी साठी लढा सुरू आहे. १० मार्च २०२६ रोजी आझाद मैदान मुंबई येथे पारायण करून धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. या लढ्याला बळ मिळावे यासाठी वडवणी येथे सर्वपक्षीय संघटना व कार्यकर्त्यांची वडवणी येथील मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या संपर्क कार्यालयात बैठक झाली. या बैठकीत आयोजक बब्रुवान शेंडगे पाटील यांनी लढ्याची पुढील दिशा सांगितली. वारकरी मेळाव्याचे २५ जानेवारी रोजी वडवणी येथे हॉटेल कृष्णा सभागृहात आयोजन केले आहे. मेळावा यशस्वी करण्यासाठी विविध समित्यांचे गठन करण्यात आले असून प्रत्येकावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या मेळाव्याला मार्गदर्शक म्हणून संतभूमी संरक्षक संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष, तुकयाभक्त मधुसूदन पाटील महाराज तपोभूमी भामचंद्र, कार्याध्यक्षा माधवीताई माने वारजे -पुणे, संपर्क प्रमुख सचिन पाटील येरळीकर, बंकट स्वामी संस्थानचे मठाधिपती लक्ष्मण महाराज मेंगडे, पुणे विभागीय मराठा महासंघाच्या अध्यात्मिक आघाडीचे प्रमुख पंडित महाराज क्षीरसागर व अन्य प्रमुख संत महंत समाजातील लोकप्रतिनिधी शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले असल्याचे बब्रुवान शेंडगे पाटील व श्रीराम महाराज शेळके यांनी सांगितले. या बैठकीत श्री शेषराव जगताप, अखिल भारतीय मराठा महासंघाच्या अध्यात्मिक आघाडीचे प्रमुख बब्रुवान शेंडगे पाटील, राज्य प्रवक्ते श्रीराम महाराज शेळके, शिवसेनेचे तालुकाप्रमुख विनायक मुळे, संतोष डावकर, प्राचार्य धुराजी राऊत, युवराज शिंदे, उद्धव काकडे, वशिष्ठ शेंडगे, शिवाजीराव मस्के, प्रकाश वजीर, दिनकर शेंडगे यांची उपस्थिती होती.

## पान ६ वरुन...

### पात्रुडजवळ ३३ किलो

पदार्थाची लागवड, साठवणुक,खरेदी, विक्री व वाहतुक होत असेल तर वरील हेल्पलाईन नंबर वर कळवावे, कळवणाऱ्या इसमांची माहीती गुप्त ठेवण्यात येईल. सदरील कामगिरी ही नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक, बीड,श्रीमती चेतना तिडके,अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, शिवाजी बंटेवाड, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, बीड,पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे,पोलीस हवालदार मारोती कांबळे,सुनिल अलगट,रामचंद्र केकान,पोना/ गोविंद भताने, पोलीस अंमलदार सचिन आंधळे, बिभीषन चव्हाण, चालक अतुल हराळे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी केली आहे.

### मराठी भाषेचा अभिमान

त्यांनी स्पष्ट केले की, न्याय लोकांपर्यंत पोहोचायचा असेल तर तो त्यांच्या भाषेतच मांडला गेला पाहिजे. मराठी भाषेचा सन्मान म्हणजे लोकशाहीचा सन्मान असल्याचेही त्यांनी ठामपणे सांगितले.

प्रमुख अतिथी प्रा. डॉ. आर. बी. धायगुडे यांनी मराठी भाषा संवर्धनासाठी सर्व स्तरातून प्रयत्न होणे आवश्यक असल्याचे सांगत, आजच्या पिढीने मराठी भाषेशी नातं घट्ट ठेवावे, असे मार्गदर्शन केले. वकील संघाचे अध्यक्ष ड. बी. आर. लवुळ यांनीही मराठी भाषेच्या संवर्धनासाठी न्यायालयीन पातळीवर राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रशांत कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमास वकील संघाचे सदस्य, न्यायालयीन कर्मचारी, पक्षकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### घाटनांदूर येथे जलद

रेल्वे या रेल्वेस्थानकातून जातात. या परंतु या रेल्वेस्थानकावर जलद रेल्वेना थांबा नसल्याने घाटनांदूरसह अंबाजोगाई केज तालुक्यातील लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातील रेल्वे प्रवाशांची गैरसोय होत आहे. प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी घाटनांदूर रेल्वेस्थानकावर नांदेड- बंगलोर संभाजीनगर-गुटूर व नांदेड पनवेल या जलद रेल्वे गाड्यांना थांबा देण्याची मागणी लेखी निवेदनाद्वारे सरपंच महेश अप्पा गारठे, पत्रकार संजय रानभरे, परमेश्वर वैद्य , महेंद्र गोदाम, उद्धव जाधव, प्रदीप भैय्या वैद्य ,उत्सव जाधव,शिवरुद्र पिंपळे, शिवम पिंपळे , महादेव कांबळे, दत्तप्रसाद दरगड, सागर गारठे,आदींनी दक्षिण मध्य रेल्वेचे सिकिंद्राबाद विभागाचे विभागीय ए डी आर एम रेल्वे व्यवस्थापक यांच्याकडे केली.

### नगर परिषदेचे वसुली विभाग

वयोवृद्ध, अपंग व गुडघ्यांचे आजार असलेले लोक सुद्धा येतात त्या लोकांना तिसऱ्या तळमजल्यावर जाण्या येण्यासाठी खुप त्रास होतोय म्हणून सदरील वसुली विभाग हे तळमजल्यावर आणल्यास नागरीकांच्या सोयीचे होईल करिता सदरील विभाग हे तातडीने खालच्या मजल्यावर स्थलांतरीत करण्यात यावे अशी मागणी गटनेते खुर्शीद आलम यांनी केली आहे, यावेळी नगरसेवक अफसर उर्फ अय्युब खान, नगरसेवक मोहसीन भाई, नगरसेवक रोहिल भाई यांच्या सह नागरिक उपस्थित होते,

### थेटेगव्हाण आश्रम शाळेतील

आयुष्य जगण्यासाठी दैनंदिन योगासने करणे आवश्यक आहे. असा विद्यार्थ्यांशी संवाद साधून विद्यार्थ्यांनी केलेली योगासनाची प्रात्यक्षिक पाहून श्री कायदे सरांनी समाधान व्यक्त करत योग शिक्षक श्री.बी.व्ही बडे सर यांनी शिकवलेले अतिशय उत्कृष्ट अशा प्रकारचे योगासने विद्यार्थ्यांनी आत्मसात केल्याचे पाहून,या प्रसंगी सांगुन विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी उपस्थित सेवाभावी संस्थेचे श्री जाधव सर,शासकीय माध्यमिक आश्रम शाळा थेटेगव्हाण शाळेचे मुख्याध्यापक श्री वनवे सर, शाळेतील सर्व शिक्षक कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

### बाळासाहेबांनी मराठी माणसाला

येथील ज्येष्ठ शिवसैनिक व नवनिर्वाचित नगरसेवकांचा सन्मान करण्यात आला या या कार्यक्रमास उपनगराध्यक्ष साहिल भैया चाऊस,भाजप नेते ज्ञानेश्वर मेंडके नितीन राव नाईक नवरे डॉक्टर अशोक तिडके जयदत्तराव नरवडे दीपक मेंडके अभय होके पाटील नारायणराव होके भागवतराव भोसले पत्रकार कमलेश परमेश्वर सोळंके बाळासाहेब आढागळे बाबुराव तिडके आदींनी उपस्थित होते

कार्यक्रमाचे आयोजन शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके युवा सेना तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे यांनी केले होते या कार्यक्रमास धोंडीराम जाधव माऊली कदम रामभाऊ सावंत सुरेश नवले जय सुतार नारायणराव चांदबोदले, महादेव सुरवसे रामेश्वर काशीद संतोष देवकते सचिन कराळे, सलीम अत्तार राजेश चव्हाण राहुल बावणे किशोर झुंजुर्के विलास नेमाने राजेश कोंबडे आदी उपस्थित होते

## तुलसी महाविद्यालयाची विद्यार्थिनी पलक सावंतची देशसेवेसाठी निवड

**बीड । प्रतिनिधी**

**देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथील बीसीए तृतीय वर्गाची विद्यार्थिनी पलक सूरज सावंत हिची नुकतीच सीमा सुरक्षा दल (बीएसएफ) मध्ये निवड झाली असून पहिल्याच प्रयत्नात तिने हे यश मिळवून महाविद्यालयाचे नाव उज्वल केले आहे.**



पलक सावंत सध्या बीसीएच्या शेवटच्या वर्षात शिक्षण घेत असून पदवीचे शिक्षण घेत असतानाच तिने देशसेवेचे ध्येय उराशी बाळगून स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली होती. महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा विभागामार्फत देण्यात येणारे नियमित मार्गदर्शन आणि तिची स्वतःची मेहनत यांच्या जोरावर तिने सीमा सुरक्षा दलाच्या परीक्षेत यश मिळवले.

पलकच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने गौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी तुलसी शैक्षणिक समूहचे संचालक मा.प्रा.प्रदीप रोडे, मुख्याध्यापक मा.राम वाघुंबरे,मा.अतुल मुळे,मा.प्रा.अर्जुन राठोड तसेच प्राचार्य प्रा.डी.जी.निकाळजे यांच्या हस्ते पलकचा प्रेरणादायी पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला आणि तिच्या मेहनत व चिकाटीचे कौतुक करून तिला पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.महाविद्यालयाच्या स्पर्धा परीक्षा विभागातून यापूर्वीही अनेक विद्यार्थ्यांनी भारतीय सैन्य दलात व विविध शासकीय सेवांमध्ये यश मिळवले आहे. पलकच्या निवडीमुळे महाविद्यालयाच्या यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून तिच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## जातेगाव येथे शिवसेना शाखेचे चंद्रकांत नवले यांच्या हस्ते उद्घाटन

गेवराई । प्रतिनिधी

जातेगाव (ता. गेवराई) येथे शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६ रोजी शिवसेना शाखेचे उद्घाटन मोठ्या उत्साहात व जल्लोषात पार पडले. बीड जिल्हाप्रमुख अँड. चंद्रकांत आप्पा नवले यांच्या हस्ते शिवसेना शाखेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी संपूर्ण परिसर भगव्या झेंड्यांनी व घोषणांनी दुमदुमून गेला होता.



उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना जिल्हाप्रमुख अँड. चंद्रकांत आप्पा नवले म्हणाले की, घर तिथे शिवसैनिक आणि गाव तिथे शिवसेना शाखा - ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हीच शिवसेनेची खरी ओळख आहे. हीच शिकवण शिवसेनाप्रमुख हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी आम्हाला दिली आहे. शाखा उद्घाटनानिमित्त जातेगावात भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीदरम्यान छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अहिल्यामाता होळकर, अण्णाभाऊ साठे व संत सेवालाल महाराज यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून शिवसैनिकांनी अभिवादन केले. या कार्यक्रमास उपजिल्हाप्रमुख नारायण शिंदे, तालुकाप्रमुख उद्धव मडके, विधानसभा प्रमुख नवनाथ गवते, शहरप्रमुख मुकेश महाजन, युवासेना तालुकाप्रमुख बिभीषण मोघे, व्हीएनटी तालुकाप्रमुख बाळासाहेब खेडकर, युवा विधानसभा प्रमुख उमेश शिंदे, युवा सेना लोकसभा प्रमुख शिवराज उगले गणेश पवार, शिवसेना नेते विक्रमराजे भोसले, प्रकाश नरनाळे यांच्यासह शाखाध्यक्ष सुरेश उत्तमराव वाघमारे, उपाध्यक्ष तात्यासाहेब बहिरे, सचिव सचिन वाघमारे तसेच असंख्य शिवसैनिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सन्मान, समता, बंधुतेमुळे समाजपरिवर्तन घडते -अॅड.पल्लवी सोळंके

### माजलगाव विकास प्रतिष्ठानतर्फे सर्वसमावेशक हळदी-कुंकू समारंभ संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

सन्मान, समता, बंधुतेमुळे समाजपरिवर्तन घडते असे प्रतिपादन दिनबंधू नागरी सहकारी पतसंस्था धारूर च्या अध्यक्षा ड. पल्लवी सोळंके व्यक्त यांनी केले त्या माजलगांव विकास प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेला हळदी-कुंकू समारंभात बोलत होत्या. हा सोहळा केवळ पारंपरिक, धार्मिक विधीपुरता मर्यादित न राहता सामाजिक समतेचा, सन्मानाचा व समावेशकतेचा ठोस संदेश देणारा ठरला. समाजातील विविध स्तरांतील महिलांना एकत्र आणत, विशेषतः आशा सेविका, स्वच्छता कर्मचारी, परिचारिका, विधवा महिला तसेच इतर गरजू व दुर्लक्षित घटकांतील महिलांचा सन्मानपूर्वक सहभाग या कार्यक्रमात नोंदवण्यात आला.





परंपरेनुसार अनेक सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांत विधवा महिलांना सहभागी करून घेतले जात नाही. मात्र या रूढी व सामाजिक बंधनांना छेद देत माजलगांव विकास प्रतिष्ठानने जाणीवपूर्वक विधवा महिलांनाही सन्मानाने सहभागी करून घेत, समाजातील विचारसरणीत सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न केला. हा उपक्रम केवळ औपचारिक न राहता महिलांमध्ये आत्मसन्मान, आपुलकी व स्वीकाराची भावना निर्माण करणारा ठरला. या कार्यक्रमाला माजलगाव नगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा माननीय शिफा बिलाल चाऊस, नीला देशमुख, जयश्री सावंत आणि सुवर्णा शिंगणे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी महिलांच्या सामाजिक सहभागाचे महत्त्व अधोरेखित करत, अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक परिवर्तन घडते, असे मत व्यक्त केले. महिलांच्या सशक्तीकरणासाठी केवळ योजना नव्हे, तर मानसिकता बदलणारे सामाजिक उपक्रम अत्यावश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.कार्यक्रमात उपस्थित हळदी-कुंकू, भेटवस्तू आणि विचारधन देऊन स्वागत करण्यात आले. विविध क्षेत्रांत सेवा देणाऱ्या महिलांचा यावेळी विशेष सन्मान करण्यात आला. स्वच्छता कर्मचारी, आरोग्य सेविका व परिचारिकांच्या सेवेमुळे समाज सुरळीत चालतो, मात्र त्यांच्या कार्याकडे अनेकदा दुर्लक्ष होते. त्यामुळे त्यांना मंचावर सन्मानित करून त्यांच्या कार्याचा गौरव करणे हा या उपक्रमाचा महत्त्वाचा भाग ठरला.कार्यक्रमस्थळी आनंद, उत्साह व भावनिक आपुलकीचे वातावरण अनुभवायला मिळाले. अनेक महिलांनी अशा प्रकारे सन्मानाने सहभागी होता आल्याबद्दल समाधान व्यक्त केले. काही महिलांसाठी हा पहिलाच असा सामाजिक कार्यक्रम होता, जिथे त्यांना कोणताही भेदभाव न करता सामावून घेण्यात आले.माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, सामाजिक बदल हा केवळ भाषणांतून होत नाही, तर प्रत्यक्ष कृतीतून घडवावा लागतो. महिलांमधील भेद, रूढी आणि मानसिक अडथळे दूर करून सर्वांना एकत्र आणण्याचा हा एक छोटासा, पण अर्थपूर्ण प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. पुढील काळातही अशा सामाजिक उपक्रमांची मालिका राबवण्याचा मानस प्रतिष्ठानने व्यक्त केला. या उपक्रमाचे विविध स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.वरूणराज तौर, महादेव वाघ, इरफान पठाण, सखाराम जोशी, ज्योती जोशी, अर्चना जाधव, संतोष पालकर आणि देवेंद्र सोळंके इत्यादींनी परिश्रम घेतले.

# बाजरी संशोधनात ऐतिहासिक टप्पा!

## जगातील पहिला तीन पालक जातींचा बाजरीचा संकरित वाण

पुणे / प्रतिनिधी

साधारणपणे कोणताही संकरित वाण हा दोन वाणांपासून पालक वाणांपासून पालक जातींपासून तयार केला जातो. पण आंतरराष्ट्रीय कोरडवाहू पीक संशोधन संस्था (इक्रिसॅट) आणि भारतीय कृषी संशोधन परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने जगातील पहिला तीन जातींचा संकरित बाजरीचा वाण विकसित करण्यात आला आहे. तीन जातींपासून संकरित बाजरीचा आरएचबी २७३' वाण राजस्थान कृषी संशोधन संस्थेतील अखिल भारतीय बाजरी संशोधन प्रकल्प केंद्राने विकसित केला आहे.



केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी ४ जानेवारी २०२६ रोजी देशात लागवडीसाठी २५ पिकांच्या १८४ सुधारित जाती जाहीर केल्या. यामध्ये आरएचबी २७३ या बाजरीच्या संकरित वाणाचा समावेश आहे. हा वाण राजस्थान, गुजरात आणि हरियाणातील ४०० मि.मी. पेक्षा कमी पाऊस पडणाऱ्या कोरडवाहू भागासाठी शिफारस करण्यात आला आहे. हा वाण तीन वेगवेगळ्या पालक जातींपासून तयार केलेला संकरित वाण आहे. सामान्यतः बाजरीचे वाण दोन जातींपासून तयार होतात, मात्र या वाणात तीन जातींचे गुणधर्म एकत्र आहेत. २०२२ ते २०२४ या कालावधीत तीन राज्यांतील ३० ठिकाणी या वाणाच्या चाचण्या घेण्यात आल्या. या चाचण्यांमध्ये सरासरी उत्पादन २,२३० किलो प्रति हेक्टर मिळाले. हे उत्पादन स्थानिक वाणांपेक्षा १३ ते २७ टक्के अधिक आहे. मोठ्या प्रमाणावर लागवड होणाऱ्या एचएचबी६७ वाणापेक्षा सुमारे २८ टक्के जास्त उत्पादने देतो. हा वाण डाऊनी मिल्ड्यू, ब्लास्ट आणि स्मट या रोगांना प्रतिकारक आहे. राजस्थान, गुजरात व हरियाणातील कोरड्या भागांसाठी हा वाण अतिशय उपयुक्त आहे. या वाणामुळे धान्याबरोबरच भरपूर चारा मिळतो, त्यामुळे पशुपालनालाही मोठा फायदा होतो.या वाणामध्ये महत्त्वाचे गुण एकत्र मिळतात : जास्त उत्पादन देण्याची क्षमता. दुष्काळ सहन करण्याची ताकद. चांगल्या दर्जाचा व भरपूर चारा असे विविध गुण यात आहेत. यामुळे शेतकऱ्यांना याचा अधिक फायदा होतो.

## सोप्या पद्धतींनी रोखा हरभऱ्यावरील मूळकुज रोगाचा धोका



सध्या हरभरा पीक फुलोऱ्याच्या अवस्थेत आहे. सध्या तापमानातील अचानक वाढ आणि सिंचनाचा अभाव यामुळे पीक मूळकूज रोगास बळी पडू शकते. त्यामुळे मूळकुज रोगाची लक्षणे, कारणे आणि उपाय जाणून घेतल्यास शेतकरी वेळेत मुळकुजवर उपाय करु शकतात आणि उत्पादनातील घट टाळू शकतात.

रोगासाठी अनुकूल परिस्थिती : मूळकूज हा रोग प्रामुख्याने बियाण्याद्वारे आणि मातीद्वारे पसरतो. फुलोरा व शेंगा तयार होण्याच्या अवस्थेत ३५ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त कमाल तापमान व सिंचनाच्या पाण्याची कमतरता असल्यामुळे मातीतील ओलाव्याचे प्रमाण ६० टक्क्यांपेक्षा कमी होते ते रोगाच्या वाढीस अनुकूल ठरते.

रोगाची लक्षणे : हा रोग बहुतेक वेळा फुलोरा ते घाटे भरण्याच्या काळात दिसतो. शेतात ठिकठिकाणी अचानक सुकलेली रोपं दिसू लागतात. पाने व खोड फिकट पिवळ्या रंगाचे होतात. मुख्य मुळे व बाजूच्या मुळांवर तपकिरी ते काळे डाग दिसतात. मुळे ठिसूळ, कोरडी होतात आणि सडायला लागतात. बाजूची मुळे कमी होतात किंवा पूर्णपणे नष्ट होतात. काही वेळा पाने अचानक सुकतात, फक्त पिवळी न पडता थेट वाळतात. रोगाचा प्रादुर्भाव वाढल्यास संपूर्ण शेतात रोपे सुकलेली दिसतात.

मूळकूज रोगाचे व्यवस्थापन : हरभरा पिकावरील मूळकुज रोगासाठी एकात्मिक व्यवस्थापन फायद्याचे ठरते. यामध्ये मुख्यत: प्रतिबंधात्मक उपाय फायदेशीर ठरतात. यामध्ये उन्हाळ्यात खोल नांगरट करावी. रोगास प्रतिबंधक वाणांची लागवड करावी. पिकाला पाण्याचा ताण पडू देऊ नये. पेरणी शिफारस केलेल्या वेळेतच करावी. उगवलेली लहान रोपे जास्त उष्णतेपासून वाचवावीत.

रासायनिक उपाय : पेरणीपूर्वी बियाण्यास बीजप्रक्रिया करावी. ट्रायकोडर्मा व्हिरिडी ४ ग्रॅम प्रति किलो बियाणे किंवा स्यूडोमोनास फ्लोरोसेन्स १० ग्रॅम प्रति किलो बियाण्याला चोळावे. प्रोक्लोराझ ५.७ टक्के अधिक टेब्युकोनाझोल १.४ टक्के ईएस या बुरशीनाशकाची ३ मिली प्रती १० किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी. याशिवाय रोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात झाल्यास पिकावर कार्बेन्डाझिम १ ग्रॅम प्रती लिटर किंवा स्यूडोमोनास फ्लोरोसेन्स किंवा ट्रायकोडर्मा व्हिरिडी २.५ किलो प्रती हेक्टर ५० किलो शेणखतासोबत वापरून द्रावण रोपांच्या बुंध्याशी ओतावे.

## रब्बी गहू पिकातील फुटवे अवस्थेत अन्नद्रव्य व्यवस्थापन

रब्बी हंगामातील गहू पीक फुटवे फुटण्याच्या संवेदनशील अवस्थेत असताना योग्य अन्नद्रव्य व्यवस्थापन केल्यास उत्पादनात लक्षणीय वाढ साधता येते. या टप्प्यावर पिकाला नत्र, स्फुरद आणि पालाश यांसारख्या प्रमुख अन्नद्रव्यांची संतुलित मात्रा आवश्यक असते, ज्यामुळे फुटव्यांची संख्या वाढून रोपांची वाढ जोमदार होते. त्यासोबतच झिंक, गंधक, लोह यांसारख्या सूक्ष्म अन्नद्रव्यांचा योग्य वापर केल्यास पिकाची आरोग्यस्थिती सुधारते आणि अन्नद्रव्यांचे शोषण प्रभावीपणे होते. खतांचा वापर नेहमी माती परीक्षणाच्या आधारे करणे अधिक फायदेशीर ठरते. तसेच या अवस्थेत योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात पाणी व्यवस्थापन केल्यास खतांची कार्यक्षमता वाढते, मुळांची वाढ चांगली होते आणि पुढील कणसाच्या विकासासाठी मजबूत पाया तयार होतो. एकात्मिक व संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापन हीच दर्जेदार उत्पादनाची गुरुकिल्ली असून शाश्वत शेतीसाठी ती अत्यंत उपयुक्त ठरते.



पिकातील अन्नद्रव्यांची कमतरता : गहू अन्नद्रव्य व्यवस्थापन करताना पिकाची अवस्था, पेरणीचा कालावधी आणि जमिनीची सुपीकता या बाबींचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. बागायती क्षेत्रात वेळेवर पेरलेल्या गव्हाला खुरपणी झाल्यानंतर साधारणपणे २१ ते ३० दिवसांच्या कालावधीत योग्य प्रमाणात नत्र देणे गरजेचे असते. यासाठी एकरी २४ किलो नत्र म्हणजेच सुमारे ५२ किलो युरियाचा वापर केल्यास पिकाच्या वाढीस चालना मिळते आणि फुटव्यांची संख्या वाढते. तर बागायती उशिरा पेरलेल्या गव्हासाठी नत्राचे प्रमाण थोडे कमी ठेवावे लागते. अशा परिस्थितीत एकरी १६ किलो नत्र म्हणजेच अंदाजे ३५ किलो युरिया देणे योग्य ठरते, ज्यामुळे पिकावर अतिरिक्त ताण न पडता संतुलित वाढ होते. यासोबतच अनेक भागांतील जमिनीत जस्ताची कमतरता आढळून येते. अशा जमिनीत फुटवे धरण्याच्या अवस्थेत, म्हणजे पेरणीनंतर ४० ते ४५ दिवसांनी झिंक ईडीटी ०.२ टक्के द्रावणाची फवारणी करणे फायदेशीर ठरते. यासाठी १० लिटर पाण्यासाठी २० ग्रॅम झिंक ईडीटी वापरल्यास पिकातील अन्नद्रव्यांची कमतरता भरून निघते, पानांचा रंग सुधारतो आणि उत्पादन क्षमतेत वाढ होते. योग्य वेळी योग्य अन्नद्रव्य व्यवस्थापन केल्यास गव्हाचे पीक सशक्त बनून अधिक व दर्जेदार उत्पादन मिळण्यास मदत होते.

लोह ईडीटीचा वापर : लोहाची कमतरता असलेल्या जमिनीत गव्हाच्या पिकात योग्य वेळी सूक्ष्म अन्नद्रव्य व्यवस्थापन करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. विशेषतः फुटवे धरण्याच्या अवस्थेत, म्हणजेच पेरणीनंतर साधारणपणे ४० ते ४५ दिवसांच्या कालावधीत लोह ईडीटीचा वापर केल्यास पिकावर सकारात्मक परिणाम दिसून येतो. यासाठी ०.२ टक्के द्रावण तयार करून प्रति १० लिटर पाण्यासाठी २० ग्रॅम लोह ईडीटी याप्रमाणे फवारणी करावी. या फवारणीमुळे पानांचा पिवळेपणा कमी होतो, हरितद्रव्य निर्मिती सुधारते आणि प्रकाशसंश्लेषणाची प्रक्रिया अधिक प्रभावी होते. परिणामी मुळांचा विकास चांगला होऊन फुटव्यांची संख्या वाढते आणि पिकाची एकूण वाढ जोमदार होते, ज्याचा थेट परिणाम उत्पादन वाढीवर होतो. मात्र हे सर्व फायदे मिळवण्यासाठी माती परीक्षणाच्या आधारेच खतांचे नियोजन करणे गरजेचे आहे. पिकाच्या गरजेनुसार खतांची योग्य विभागणी पेरणीवेळी, उगवणीनंतर आणि दाणे भरण्याच्या अवस्थेत केल्यास अन्नद्रव्यांचा अपव्यय टाळता येतो आणि पिकाला संपूर्ण वाढीच्या काळात संतुलित पोषण मिळते. अशा शास्त्रीय व टप्प्याटप्प्याने केलेल्या अन्नद्रव्य व्यवस्थापनामुळे गव्हाचे पीक निरोगी राहून अधिक व दर्जेदार उत्पादन मिळण्यास मदत होते.

## निशीगंधाची एकदा लागवड करा आणि पुढचे तीन वर्ष उत्पन्न घ्या

निशिगंध हे एक व्यापारी फुलपीक असून, त्याची लागवड महाराष्ट्रात चांगल्या प्रकारे करता येते व हे पिक राज्यात उत्कृष्ट रित्या उत्पादन देते. निशिगंधाची फुले हारामध्ये वापरली जातात. शिवाय विविध प्रकारच्या पुष्परचनेमध्ये देखील या फुलांचे वेगळे स्थान आहे. यामध्ये सिंगल व डबल याप्रमाणे फुलांतील पाकळ्यांच्या रचनेप्रमाणे प्रकार पडतात. सिंगल प्रकारच्या निशिगंधाची फुले अधिक जास्त सुवासिक असतात व त्यांचा वापर हारांमध्ये व गजऱ्यांमध्ये केला जातो. डबल प्रकारच्या निशिगंधाच्या फुलदांड्याचा वापर पुष्परचनेमध्ये व बुकेमध्ये केला जातो. या फुलांचा वापर सुगंधी द्रव्ये निर्माण करण्यासाठी देखील केला जातो. जमीन व हवामान : निशिगंधाची लागवड कोणत्याही हवामानात करता येते. यासाठी पाण्याचा उत्तम निचरा होणारी कसदार जमीन चांगली मानवते. पाण्याचा निचरा न होणाऱ्या जमिनीत कंद सडतात व झाड मरते. त्यामुळे दलदलीची व निचरा न होणारी जमीन या पिकासाठी निवडू नये.

अभिवृद्धीचा प्रकार : निशिगंधाची लागवड कंदापासून करतात. एका कंदापासून दुसऱ्यावर्षी ५ ते ६ कंद विकसित होतात. त्यातील प्रत्येक कंद



मुख्य कंदापासून विलग (वेगळा) करून त्याची लागवड करतात. निशिगंधाची लागवड एप्रिल, मे किंवा सप्टेंबर ऑक्टोबर महिन्यात करावी.

लागवड : निशिगंधाची लागवड जमिनीच्या प्रकारानुसार सपाट वाफ्यामुळे किंवा सरी-वरंब्यावर केली जाते. हलकी ते मध्यम व उत्तम निचऱ्याची असेल तर ३ मी. बाय २ मी. आकारमानाच्या सपाट वाफ्यात ३० बाय २० सें.मी. अंतरावर ४ ते ५ सें.मी. खोल लागवड केली जाते. जमीन जर काही कसदार असेल तर ४५ बाय ३० सें.मी. अंतरावर वरंब्याच्या मध्यभागी ५ ते ६ सें.मी. खोल कंदाची लागवड केली जाते. निशिगंधाचे हेक्टरी १ लाख ते १.५ लाख कंद लागतात. लागवड पूर्ण झाल्यावर ताबडतोब पाणी द्यावे.

लागवड पूर्व तयारी : ज्या ठिकाणी निशिगंधाची लागवड करावयाची आहे ती जमीन मार्च एप्रिल महिन्यात खोल नांगरावी. त्यानंतर दोन ते तीन वेळा फणणी करून धसकटे, हरळीच्या कशा वेचाव्यात व जमीन स्वच्छ व भुसभुशीत करावी. त्यानंतर हेक्टरी २५ ते ३० टन चांगले कुजलेले शेणखत पसरावे व हेक्टरी ७५ किलो नत्र, ३०० किलो स्फुरद, व ३०० किलो पालाश लागवडीपूर्वीच जमीनीत मिसळून द्यावे. वरील सर्व सेंद्रिय व रासायनिक खते जमिनीत चांगले मिसळून घ्यावीत व नंतर जमिनीच्या प्रकारानुसार सपाट वाफे अथवा सऱ्या पाडून रान बांधणी करावी.

खते : लागवडीनंतर ४५ दिवसांनी हेक्टरी ६५ किलो नत्र व ९० दिवसांनी ६० किलो नत्र द्यावे. निशिगंधास प्रति वर्षी २०० किलो नत्र, ३०० किलो स्फुरद व ३०० किलो पालाश याप्रमाणे खते आवश्यक आहेत.पाणी : निशिगंधाच्या पिकास हंगामनिहाय व जमिनीच्या मगदुराप्रमाणे ८ ते १० दिवसांनी पानाच्या पाळ्या द्याव्यात. निशिगंधास तुषार सिंचनाद्वारे पाणीपुरवठा केल्यास उत्पादनास चांगली वाढ होऊ शकते.

आंतरमशागत : निशिगंध हे कंदवर्गीय पीक असल्याने वेळचे वेळी गवताची खुरपणी करून लागवडीचे क्षेत्र स्वच्छ व भुसभुशीत ठेवणे आवश्यक आहे. सरी वरंब्यावरील लागवडीमध्ये जर वारंवार पाणी दिल्याने कंद उघडे पडू लागले तर दर ३ महिन्यांनी पिकाची खांदणी करून मातीचा भर देणे आवश्यक आहे. प्रत्येक खांदणीच्या वेळी खते दिल्यास उत्पादनात चांगली वाढ होते.

जाती : डबल - सुहासिनी, सिंगल - शृंगार, सिंगल - रजत, रेखा, व्हेरीगेटेड - सुवर्ण रेखा.

पीक संरक्षण : निशिगंधास मावा, फुलकिडे व अळी या किडींचा व फुलदांड्याची कुज व पानांवरील ठिपक्या रोगांचा मुख्यत्वेकरुन पावसाळी प्रादुर्भाव दिसून येतो. त्यासाठी पुढीलप्रमाणे कोणत्याही एका कीटकनाशकाची / बुरशीनाशकाची फवारणी करावी. मावा व फुलकिडे - यांच्या प्रतिबंधासाठी मोनोक्रोटोफॉस ३६% प्रवाही ,१५ मिली प्रति १० लिटर पाण्यात, फॉस्फोमिडॉन ८५% प्रवाही,१० मिली,प्रति १० लिटर पाण्यात, तसेच डायमेथोएट ३०% प्रवाही, १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून वापरावे. अळी - याच्या प्रतिबंधासाठी एन्डोसल्फान ३५% प्रवाही, २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे फुल- दांड्यातील कुज व पानावरील ठिपके याकरिता डायथेन एम-४५,कार्बनडेझिम ५०% २० ग्रॅम,पाण्यात विरघळणारी पावडर २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे

उत्पादन : निशिगंधापासून प्रति हेक्टर प्रतिवर्ष ५० क्विन्तल (५ मी. टन) सुटी फुले अथवा सुमारे २.५ लाख फुलदांडे याप्रमाणे उत्पादन मिळते.

## दिन विशेष

### जागतिक दिवस:
### राष्ट्रीय मतदार दिवस
### राष्ट्रीय पर्यटन दिवस

#### महत्वाच्या घटना

१७५५ : मॉस्को विद्यापीठाची स्थापना झाली.
१९८० : संत मदर तेरेसा यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित.
१८८१ : थॉमस अल्वा एडिसन आणि अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल यांनी ओरिएंटल टेलिफोन कंपनीची स्थापना केली.
१९८३ : आचार्य विनोबा भावे यांना मरणोपरांत भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
१९१९ : पहिले महायुद्ध संपल्यानंतर लीग ऑफ नेशन्सची स्थापना झाली.
१९४१ : 'प्रभात'चा 'शेजारी' हा चित्रपट रिलीज झाला.
१९५० : राष्ट्रीय मतदार दिन
१९७१ : हिमाचल प्रदेशला पूर्ण राज्याचा दर्जा मिळाला व ते भारताचे १८ वे राज्य बनले.
१९८२ : आचार्य विनोबा भावे यांना 'भारतरत्न'
१९९१ : मोरारजी देसाई यांना 'भारतरत्न'
१९९५ : अमेरिकेने धृवीय प्रकाशाची माहिती घेण्यासाठी एक क्षेपणास्त्र सोडले. रशियन सरकारच्या रडारवर ते दिसू लागताच अमेरिकेने अण्वस्त्र सोडले असावे, असा संशय रशियन अधिकार्यांनी व्यक्त केल्यामुळे रशियाचे अध्यक्ष बोरिस येल्त्सिन यांनी अमेरिकेवर अण्वस्त्रे डागण्यासाठी 'न्युक्लिअर ब्रिफकेस' हातात घेतेली होती!
२००१ : स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर व शहनाईनवाझ बिस्मिल्ला खाँ यांना 'भारतरत्न'
२००२ : वायू सेनेचे पहिले ''एयर मार्शल'' म्हणून अर्जन सिंग यांची नियुक्ती.
२००४ : ऑपर्च्युनिटी नावाचे अंतरिक्ष यान मंगळावर यशस्वीरित्या उतरले.

#### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६२७ : रॉबर्ट बॉईल - आयरिश रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: ३० डिसेंबर १६९१)
१७३६ : जोसेफ लाग्रांगे - इटालियन गणितज्ञ (मृत्यू: १० एप्रिल १८१३)
१८२४ : बंगाल चे प्रसिद्ध कवी माइकल मधुसूदन दत्त यांचा जन्म.
१८६२ : रमाबाई रानडे - 'सेवा सदन'च्या संस्थापिका व सामाजिक कार्यकर्त्या (मृत्यू: १९२४)
१८७४ : डब्ल्यू. सॉमरसेट मॉम इंग्लिश लेखक व नाटककार (मृत्यू: १६ डिसेंबर १९६५)
१८८२ : व्हर्जिनिया वूल्फ - ब्रिटिश लेखिका (मृत्यू: २८ मार्च १९४१)
१९३७ : भारतीय अभिनेत्री पद्माराणी यांचा जन्म.
१९३८ : सुरेश खरे - नाटककार व समीक्षक
१९५८ : कविता कृष्णमूर्ती - पार्श्वगायिका
१९६९ : प्रसिद्ध लेखक अश्विन संगी यांचा जन्म.
१९९० : प्रसिद्ध अभिनेत्री पूजा सावंत यांचा जन्म.

#### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६६५ : सोनोपंत डबीर
१९१८ : भारतातील स्कॉटिश सिव्हिलर्स विलियम वेडरबर्न यांचे निधन.
१९५३ : भारतीय उद्योजक नलिनी रंजन सरकार यांचे निधन.
१९८० : लक्ष्मणशास्त्री दाते - सोलापूरचे 'दाते पंचांग'कर्ते (जन्म: १८९०)
१९९६ : प्रशांत सुभेदार - रंगभूमी व चित्रपटांतील गुणी अभिनेते.
२००१ : विजयाराजे शिंदे - भारतीय जनता पक्षाच्या नेत्या (जन्म: १९१९)
२०१५ : मधुकर दत्तात्रय तथा म. द. हातकणंगलेकर - ज्येष्ठ समीक्षक आणि सांगली (२००८) येथील ८१ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष (जन्म: १ फेब्रुवारी १९२७ हातकणंगले).

## जगातील सर्वात महागडी 'व्हिएटिना-१९' गाय आता भारतातही

जगातील सर्वात महागडी गाय म्हणून ब्राझीलमधील 'व्हिएटिना-१९' नावाने ओळखली जाते. ही गाय जगातील सर्वात महागडी गाय ठरली आहे. या गायीला लिलावात तब्बल ३४ कोटी रुपये म्हणजेच ४.१ मिलियन अमेरिकन डॉलर्सची बोली मिळाली. आता ही गाय भारतातही उपलब्ध होत आहे. 'व्हिएटिना-१९' च्या आगमनाने भारतातील दुग्धव्यवसायात मोठे बदल घडून येण्याची शक्यता आहे. उच्च उत्पादक गायींच्या उपलब्धतेमुळे दूध आणि मांस उत्पादनात वाढ होण्यास मदत होईल आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही वाढ होईल

'व्हिएटिना-१९' गायीची वैशिष्ट्ये : ही 'मू-जेनिक्स' नावाच्या दुर्मिळ जातीची गाय आहे. सरोगेट गायींमध्ये भ्रूण रोपण आणि क्लोनिंगसाठी या गायीचा वापर केला जातो. उत्कृष्ट दर्जाचे दूध आणि मांस देणारी ही गाय आहे. 'व्हिएटिना-१९' मुळे दूध आणि मांस उत्पादनात वाढ होण्याची अपेक्षा आहे.



गायीच्या सुरक्षेसाठी सीसीटिव्ही आणि सुरक्षा रक्षक :जगातील सर्वात महागडी गाय असल्यामुळे 'व्हिएटिना-१९' च्या सुरक्षेची विशेष काळजी घेतली जाते. ब्राझीलमधील एका फार्ममध्ये सीसीटिव्ही कॅमेरे आणि सशस्त्र सुरक्षा रक्षकांच्या देखरेखीखाली या गायीचे संगोपन केले जाते. भारतातही लवकरच प्रजनन : या महागड्या गायीची गुणसूत्रे लवकरच भारतात आणली जाणार आहेत आणि त्याच तंत्रज्ञानाचा वापर करून भारतातही 'व्हिएटिना-१९' सारख्या उच्च उत्पादक गायींचे प्रजनन केले जाणार आहे. यामुळे भारतातील दुग्ध व्यवसायात क्रांती घडून येण्याची शक्यता युएई आणि युएसए मध्येही मोठी मागणी : भारतासह अनेक देशांनी 'व्हिएटिना-१९' गायीच्या उत्पादनात रस दाखवला आहे. यात युएई आणि युएसए मधील खरेदीदारांचाही समावेश आहे. 'व्हिएटिना-१९' च्या गुणसूत्रांचा वापर करून नवीन प्रजातींचा विकास करण्यात येणार आहे.

cmyk



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

रविवार दि.२५ जानेवारी २०२६ ५



# स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान यशस्वी राबवा-आशिमा मित्तल

## कुष्ठरुग्णांना सन्मानने वागणुक देण्याचे आवाहन

जालना । प्रतिनिधी

स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान दि. ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत सुक्ष्म नियोजन करुन प्रभावीपणे राबविण्यांच्या स्पष्ट सुचना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा समन्वय समिती बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी डॉ.राजेंद्र पाटील जिल्हा शल्य चिकित्सक, डॉ.जी.डी.म्हस्के सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ.जी.एम.कुडलीकर जिल्हा क्षयरोग अधिकारी, डॉ.रघुवीर चंदेल माता बाल संगोपन अधिकारी, डॉ.अतुल राजे आरोग्य वैद्यकिय अधिकारी मनपा जालना, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकिय अधिक्षक, अधिकारी वर्ग व सहाय्यक संचालक कुष्ठरोग कार्यालय येथील कर्मचारी उपस्थित होते. श्रीमती मित्तल म्हणाल्या की, या अभियान अंतर्गत दि. २६ जानेवारी




प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहणानंतर शासकीय कार्यालय व सरपंच यांनी ग्रामसभा घेऊन कुष्ठरोगाबाबत मार्गदर्शन करुन प्रतिज्ञा घेण्याच्या सूचना दिल्या. तसेच 'भेदभाव समाप्त करु या, सन्मानाची वागणुक देऊ या' या घोषवाक्याची अमंलबजावणी करण्याचे आवाहन केले. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांनी दि. ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत कुष्ठरोग निवारण दिन व पंधरवाडा साजरा करतांना शाळा/महाविद्यालयामध्ये कुष्ठरोगाच्या प्रतिज्ञाचे वाचन करुन कुष्ठरोग विषयी औषधोपचार व आजाराबाबत गैरसमज माहिती द्यावी.

आरोग्य सेवा कुष्ठरोग सहाय्यक संचालक डॉ.सुधाकर शेळके यांनी दि. ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) अंतर्गत विट भट्टी, आश्रमशाळा, बांधकाम मजुर, कंपनीतील कामगार, कारागृहातील कैदी, झोपडपट्टी, स्थलांतरीत झालेला भागाचा प्रमुख्याने लक्ष केंद्रीत करुन सर्व्हेक्षण करण्यांत येणार असल्याचे सांगितले. तसेच सर्व्हे टीममध्ये एक आशा व एक पुरुष कर्मचारी किंवा स्वयंसेवक असणार आहे. तसेच कुष्ठरुग्णांच्या संपर्कातील नातेवाईकांना (सहवासिंतांना) रिफॅम्पिसीन या गोळीचा एक डोस देऊन संसर्गापासुन सुरक्षित करण्यांत येणार आहे. तसेच जालना यांनी कुष्ठरोगाची जालना जिल्हयातील कुष्ठरोगाची सद्यस्थिती व कुष्ठरोगाबाबत सविस्तर माहिती दिली.

# मुलांना मैदानी खेळात भाग घेण्यासाठी पालकांनी पुढाकार घ्यावा

## लालबहादूर शास्त्री विद्यालयातील पालक मेळाव्यात विशाखा राखे यांचे प्रतिपादन



परतूर । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना मोबाईल पासून दूर ठेऊन मैदानी खेळात सहभागी करण्यास पालकांनी पुढाकार घ्यावा, असे उद्गार परतूर येथील लाल बहादूर शास्त्री कन्या विद्यालयात आयोजित पालक मेळाव्यात बोलताना उपनागराध्यक्षा विशाखा राखे यांनी काढले. यावेळी व्यासपीठावर कन्या शाळेची माजी विद्यार्थी नगरसेविका स्नेहा अग्रवाल, कस्तुरबा गांधी वसतिगृहाच्या अधिक्षका मंगल खवणे, निवृत्त शिक्षक तुकाराम जईद, निवृत्त प्राचार्य रामराव घुगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

परतूर येथील लाल बहादूर शास्त्री कन्या विद्यालयात दि.२३ रोजी पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पालकांसह मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना विशाखा राखे यांनी सांगितले की, मुलींच्या शिक्षणा बरोबर त्यांची सुरक्षितता पण महत्वाची असते आणि याबाबतीत कन्या शाळेचे शिक्षक फार तत्पर आहेत. तसेच मुलींना मोबाईल वापरावर पालकांनी बंदी घालावी. अनावश्यक मोबाईल वापर टाळला पाहिजे असे त्यांनी सांगितले.

यावेळी स्नेहा अग्रवाल यांनी बोलताना शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा दिला आणि मुलींना मार्गदर्शन केले. याप्रसंगी पालकांचे खेळ घेण्यात आले. प्रथम क्रमांक आलेल्या पालकांना पैठणी साडी भेट देण्यात आली.

या कार्यक्रमाला परतूर, खडकी, उस्मानपूर, जिरडगाव, चिंचोली, रोहिना, रेवळगाव येथील महिला, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश बरीदे यांनी केले तर आभार श्रीमती वृन्दा डक यांनी मानले.

# जन्मठेपेची शिक्षा भोगणाऱ्या कैद्याने पैठणला जीवन संपवले

पैठण । प्रतिनिधी

पैठण ते शेवगाव मार्गावरील येथील जिल्हा खुले कारागृहात जन्मठेपेची शिक्षा भोगणाऱ्या कैद्यानी शुक्रवारी ( दि.२३) सकाळी कारागृहाच्या पाठीमागील मोकळ्या जागेत चिंचाच्या झाडाला दोरीच्या साह्याने गळफास लावून जीवन संपवले.

बंदीचे नाव शांतीलाल तान्ह्या ओझरे (वय ४४ वर्ष रा. पालघर) असे आहे.

२०२३ मध्ये शांतीलाल तान्हा ओझरे हा बंदी जन्मठेपेची शिक्षा भोगण्यासाठी नाशिक कारागृहातून पैठण येथील जिल्हा खुले कारागृहात येथे वर्ग झालेला होता. या बंदिनी शुक्रवारी सकाळी कारागृहाच्या भिंतीच्या पाठीमागे असलेल्या मोकळ्या जागेत चिंचेच्या झाडाला दोरीने गळफास घेतल्याचा प्रकार उघडकीस आला.

याची माहिती पैठण खुले कारागृह अधीक्षक राजेंद्र निमगडे यांना देण्यात आली. पैठण पोलिस निरीक्षक महादेव गोमारे यांना याबाबत सांगितल्यानंतर खुले कारागृह येथे नायब तहसीलदार राहुल बनसोडे, पोलिस निरीक्षक महादेव गोमारे, उपनिरीक्षक संभाजी खाडे, उपनिरीक्षक अजीज शेख, पोकॉ महेश माळी, अंधारे, तांबे, लक्ष्मण पुरी, ढाकणे यांनी पंचनामा केला. उपनिरीक्षक अजिज शेख पुढील तपास करीत आहे.

# नॅशनल स्कूल बँड स्पर्धेत संजीवनी सैनिकी शाळा देशात प्रथम तर मुंबईच्या डॉन बॉस्को शाळेला तृतीय क्रमांक


अहिल्यानगर । प्रतिनिधी

प्रजासत्ताक दिन सोहळा २०२६ चे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या सातव्या नॅशनल स्कूल बँड कॉम्पिटिशनमध्ये महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी आपल्या शिस्तबद्ध संचलनाने आणि सुरावटींनी राजधानी दिल्लीत महाराष्ट्राच्या पराक्रमाचा झेंडा फडकवला आहे. नवी दिल्लीतील नॅशनल बाल भवन येथे संपन्न झालेल्या या महाअंतिम फेरीत मुलांच्या ब्रास बँड गटात अहिल्यानगर (कोपरगाव) येथील संजीवनी सैनिकी शाळेने देशात प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदकावर नाव कोरले. तर, मुलींच्या ब्रास बँड गटात मुंबईच्या डॉन बॉस्को हायस्कूलने राष्ट्रीय स्तरावर तृतीय क्रमांक प्राप्त करत राज्याचा गौरव वाढवला.

या दिमाखदार सोहळ्याचा पारितोषिक वितरण समारंभ माननीय संरक्षण राज्यमंत्री श्री. संजय सेठ यांच्या शुभहस्ते पार पडला. विजेत्या संघांना राष्ट्रीय करंडक आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरवताना संरक्षण राज्यमंत्र्यांनी विद्यार्थ्यांच्या परिश्रमाचे कौतुक केले. ते म्हणाले की, शालेय बँड पथके ही केवळ संगीताचे सादरीकरण करत नाहीत, तर ती तरुण पिढीमध्ये शिस्त, सांघिक भावना आणि प्रखर देशभक्ती रुजवण्याचे कार्य करतात. या कार्यक्रमाचे उद्घाटन शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाचे सचिव संजय कुमार आणि संरक्षण मंत्रालयाचे सचिव श्री. राजेश कुमार सिंह यांच्या संयुक्त उपस्थितीत करण्यात आले. यावेळी बोलताना संजय कुमार यांनी नमूद केले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या उद्दिष्टांनुसार विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ही स्पर्धा एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरली आहे. लष्करी बँडच्या परंपरेतून प्रेरणा घेऊन सुरू झालेली ही स्पर्धा विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित करण्यास मदत करते, असेही त्यांनी स्पष्ट केले. या स्पर्धेत संपूर्ण देशातील ७६३ शाळांमधील सुमारे १८,०१३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विविध स्तरांवरील चाचणीनंतर अंतिम फेरीसाठी निवडल्या गेलेल्या १८ शाळांच्या बँड पथकांमध्ये महाराष्ट्राच्या शाळांनी बाजी मारली. मुलांच्या ब्रास बँडमध्ये अहिल्यानगरच्या संजीवनी सैनिकी शाळेने आपल्या अचूक तालावर आधारित सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. त्याचप्रमाणे, मुंबईच्या विक्रोळी येथील डॉन बॉस्को प्रशालेच्या मुलींच्या पथकाने अत्यंत चुरशीच्या स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवून आपले कौशल्य सिद्ध केले.

## ।। थोडक्यात

### राजेश्वरी महाविद्यालयात जयंती साजरी



**कर्जत / सचिन काळुंके**

अंबड तालुक्यातील कर्जत येथे राजुरेश्वर महाविद्यालयात बाळासाहेब ठाकरे जयंती व सुभाष चंद्र बोस यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रगतशील शेतकरी पांडुरंग तात्या डोंगरे, माजी सरपंच विजय काका डोंगरे, संजय काळुके, चेअरमन ज्ञानेश्वर भाऊ डोंगरे, उपसरपंच आण्णासाहेब डोंगरे, माजी सरपंच शिहरी काका डोंगरे, विष्णू चिधे, नशिरभाई शेख, सुरेश भाऊ उगले, अंबादास सानप, विजय ज्ञानदेव डोंगरे, नारायण थेटे, प्राचार्य विलास टकले यांच्यासह शिक्षकवृंद हजर होते.

### ना. रामदास आठवले यांची संतोष खारवणे यांनी घेतली भेट

मंठा । प्रतिनिधी



केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे राष्ट्रीय अध्यक्ष ना. रामदास आठवले यांची मुंबई येथे युवासेनेचे उपतालुकाप्रमुख संतोष खारवणे यांनी सदिच्छा भेट घेतली.या भेटीत तालुक्यातील सामाजिक न्याय, दुर्बल व वंचित घटकांचे प्रश्न तसेच केंद्र सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. भेटीदरम्यान मागासवर्गीय समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी, युवकांच्या रोजगाराच्या संधी तसेच सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सकारात्मक संवाद झाला. संतोष खारवणे यांनी स्थानिक पातळीवरील सामाजिक प्रश्न व जनतेच्या अपेक्षा ना. आठवले यांच्या निदर्शनास आणून दिल्या. यावर त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत समाजहिताच्या कार्यासाठी केंद्र सरकारकडून आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

### रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान-बोराडे

मंठा । प्रतिनिधी




रक्तदान हेच श्रेष्ठ दान असुन रक्तदानामुळे एखाद्याला जीवनदान मिळते त्यामुळे रक्तदान करा असे आवाहन युवासेना तालुकाप्रमुख डिगांबर बोराडे यांनी केले. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त मंठा येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

मंठा युवा सेनेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे गुरुवार दि. २२ रोजी आयोजित रक्तदान शिबिराला गोपी गायकवाड, अशोक घारे, मनु गिरी, आवेश पठाण, दत्तात्रय काळे, संतोष शेंडगे, विष्णु बहाड, सिद्धेश्वर खंदारे, विकास शेळके, ज्ञानेश्वर खरात, भारत भुसारे, गोपाळ खंदारे, ज्ञानेश्वर खंदारे यांच्यासह युवा सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी लोकमान्य ब्लड बँकेच्या डॉक्टर, कर्मचाऱ्यांनी रक्तदात्यांचे रक्तसंकलन केले. यावेळी डिगांबर बोराडे म्हणाले की, एखाद्या अपघातग्रस्त व्यक्तीला, गरोदर महिलेला कॅन्सर किंवा थॅलेसेमिया रुग्णाला जिवंत राहण्यासाठी रक्ताची गरज असते अशा वेळी आपण दिलेले काही थेंब रक्त एखाद्याचे संपूर्ण जीवन वाचवू शकते, याहुन मोठे पुण्याचे काम दुसरे कुठलेच नाही. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे ते प्रत्येकाने केले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले.

# उमरगा तालुक्यात निवडणुकीसाठी २५३ उमेदवार रिंगणात

उमरगा। प्रतिनिधी

तालुक्यातील जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गण निवडणुकीत २७० उमेदवारांनी ५४० नामनिर्देशन पत्राची खरेदी केली होती. दोन्ही मिळून १६३ जणांनी ३१६ उमेदवारी अर्ज दाखल केले होते. दाखल अर्जाची छाननी प्रक्रिया पार पडली. छाननीत जिपचे ९० जणांचे तर पंचायत समिती गणांसाठी १६३ जणांचे अर्ज वैध ठरले.

उमरगा तालुक्यातील जिल्हा परिषद ९ गट व पंचायत समिती १८ गण निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या मुदती अखेरपर्यंत जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत २७० जणांनी ६३९ उमेदवारी अर्ज घेतले होते. यात जिप २७८ तर पंचायत समिती ३६१ अर्जाचा समावेश आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत बुधवारी दुपारी तीन वाजता संपली. जिल्हा परिषद गटांसाठी ९० जणांनी ११८ तर पंचायत समिती गणासाठी १६३ जणांनी १९८ दोन्ही मिळून २५३ जणांनी ३१६ उमेदवारी अर्ज दाखल केले होते. तहसील कार्यालयात गुरुवारी निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी गोविंद येरमे यांच्या उपस्थितीत दाखल अर्जाची छाननी प्रकीया पार पाडली, यावेळी लातूरच्या अप्पर जिल्हाधिकारी तथा निवडणूक निरिक्षक शिल्पा करमरकर, माजी खासदार प्रा रविंद्र गायकवाड, आमदार प्रवीण स्वामी आदिसह उमेदवार आणि त्यांचे प्रतिनिधींच्या उपस्थितीत छाननी प्रक्रिया पार पडली. छाननी प्रक्रियेत जिल्हा परिषद गटाच्या ९ जागेसाठी ९० अर्ज तर पंचायत समितीच्या १८ गणासाठी १६३ वैध ठरले. छाननीत वैध ठरलेले नामनिर्देशन पत्र उमेदवारांना मंगळवारी (दि २७) जानेवारी दुपारी तीन वाजेपर्यंत आपला उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे. त्यानंतर निवडणूक चिन्ह वाटप करण्यात येणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी दत्तू शेवाळे यांनी दिली. छाननी प्रक्रिये दरम्यान तुरोरी जिप गटातील भाजपा अधिकृत उमेदवार प्रियंका प्रकाश आष्टे यांच्या अर्जावर अपक्ष उमेदवार पुजा विकास जाधव यांनी आक्षेप नोंदवला होता. तर अपेक्षा आष्टे यांनी भाजपा कडून उमेदवारी नाकारण्यात आलेल्या अपक्ष अर्चना जाधव यांचे जात प्रमाणपत्र कर्नाटक राज्यातील असल्याचा आक्षेप घेतला होता,

# डोकेवाडा जोड रस्ता डांबरीकरण कामाला प्रथम प्राधान्य -राजेंद्र मस्के

बीड। प्रतिनिधी

लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील डोकेवाडा गावात लहान बालकांच्या शिक्षण, पोषण आणि संस्कारासाठी अत्यावश्यक असलेल्या नव्या अंगणवाडी इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या हस्ते व हभप तुकाराम महाराज, हभप मोहन बाबा कदम महाराज,

सरपंच बाप्पासाहेब कदम, यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी फेडरेशन संचालक बद्रीनाथ जटाळ, सुग्रीव डोके,डोके बाबुराव मुकादम, माजी सरपंच ईश्वर वाळेकर, सदस्य देविदास वाघ,डोके किसन सौदागर, चंद्रसेन जाधव, आसाराम डोके, अनिल अनपट, सस्ते आपाराव, बबनराव सस्ते, रमेश डोके ,शंकर डोके, किसनराव कदम, महादेव डोके, विलास कदम बजरंग डोके, युवराज कदम, सोमीनाथ डोके, श्रीराम कदम, लक्ष्मण डोके अभिमान डोके, रत्नाकर डोके, रमेश डोके, राजेभाऊ डोके, शिवाजी तुपे, भास्कर कदम, उपसरपंच बबलू भांडवलकर, सचिन मस्के, सतीश कळसुले अंकुश सस्ते, अरुण वाळेकर तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के म्हणाले, गावाचा खरा विकास म्हणजे पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी,लाईट आणि रस्ते यांचा समतोल विकास. ग्रामीण भागात अंगणवाडी ही मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठीची पहिली शाळा आहे.

## जाहीर प्रगटन

आमचे पक्षकार प्रिती अरुण जाधव व गणेश अरुण जाधव रा.बीड, ता. जि. बीड यांनी दिलेल्या माहिती व सुचनेनुसार व अधिकरावरुन सर्व जनतेस कळविण्यात येते की, कसबे बीड मोहल्ला तरफ पिंगळे, येथील नगर परिषद हद्दीचे आतील सर्व्हे नंबर २१०, तरफ पिंगळे मधील प्लॉट ज्याचा बीड नगर परिषद मालमत्ता क्र. नवा १-१-३०३६ असा मिळालेला आहे ज्याची लांबी पुर्व पश्चिम १२.१९ मीटर व रुंदी दक्षिण उत्तर ९.१४ मीटर ज्याचे एकुण क्षेत्रफळ १११.५२ चौरस मिटर असलेल्या मिळकती चे मालक व कब्जेदार सौ. गौळणबाई राजेंद्र केदार यांचे कडून वर वर्णनातील प्लॉटची मिळकत खरेदी करण्याचा ठराव झालेला आहे.

ज्यांची चतः सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस - स्वाती भालशंकर व वसंत ईंगावले यांची घरजागा

पश्चिमेस -६ मीटर रुंदीचा रस्ता

दक्षिणेस -श्री. परमेश्वर विद्यागर यांचे घर

उत्तरेस - श्री. साबळे यांचे घर

येणे प्रमाणे चतः सिमे अंतरर्गत येणारी प्लॉट पैकी मिळकत आमचे पक्षकाराने खरेदी करण्याचा करार केला असून लवकरच नोंदणीकृत खरेदीखत करण्याचे ठरले आहे.

तरी सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, वरील वर्णन केलेली सर्व्हे नंबर २१०, तरफ पिंगळे मधील प्लॉट मिळकती चे संदर्भात कोणाचे काही हितसंबंध, वारस हक्क, वाटणी, गहाणखत, कर्ज व देवाण-घेवाण, चोळी-बांगडीचे हक्क अथवा ईतर हक्क असतील तर त्यांनी सबळ पुराव्यानिशी प्रगटण प्रसिध्द झालेपासून ७ (सात दिवस) दिवसांच्या आत आमचेशी खालील पत्यावर संपर्क साधवा व आपला आक्षेप/उजर नोंदवावा सदर मुदतीत कोणचाही आक्षेप अथवा उजर आला नाही तर उपरोक्त वर्णन केलेल्या सर्व्हे नंबर २१०, तरफ पिंगळे मधील प्लॉट मिळकती चे नोंदणीकृत खरेदीखत आमचे पक्षकार करून घेतील त्यानंतर आलेला आक्षेप विचारात घेतला जाणार नाही. करीता हे जाहीर प्रगटण.

मार्फत
**अॅड. आदर्श अरुण जाधव**
**मो.नं.९६७३९७३६८६**

**जाहीर प्रगटण देणार**
**प्रिती अरुण जाधव**
**गणेश अरुण जाधव**

# फेस्टिव्हलसाठी सर्वतोपरी सहकार्य करणार-आ. राजेश राठोड

मंठा । प्रतिनिधी

शिवसेना तालुकाप्रमुख तथा नगरसेवक प्रदीप बोराडे यांनी क्रिकेट चषकाच्या माध्यमातून तालुक्यातील खेळाडूंना खेळण्याची संधी दिली. आपल्या नेतृत्व कौशल्याने त्यांनी उत्कृष्ट आयोजन केले. मंठा फेस्टिव्हल साठी त्यांनी पुढाकार घ्यावा आपण सर्वतोपरी सहकार्य करणार अशी ग्वाही आ. राजेश राठोड यांनी दिली.

मंठा येथे नगरसेवक प्रदीप भाऊ बोराडे क्रिकेट चषकाचे उद्घाटन आ. राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेना जिल्हाप्रमुख महेश नळगे यांची उपस्थिती होती. व्यासपीठावर क्रिकेट चषकाचे आयोजक तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे, युवा नेते सुरेश पवार, उपनगराध्यक्ष अरुण वाघमारे, माजी सरपंच अनंता वैद्य, कयूमभाई कुरेशी, उबेद बागवान, प्रकाश घुले, इंजि. राहुल वानखेडे, श्याम टाके, शरद मोरे, डॉ. स्वप्नील वायाळ, नंदू टकले, संदीप खंडागळे, तुळशीराम गायकवाड, नागेश सराफ यांची उपस्थिती होती. यावेळी आ. राठोड यांनी नगरसेवक प्रदीप बोराडे यांच्या आयोजनाचे कौतुक केले. वैभवशाली कुटुंबातून ते आलेले



असल्यामुळे नेतृत्व गुण त्यांच्यामध्ये दिसून येतात. त्यांच्या पुढाकारातून मंठा फेस्टिव्हल घेण्यात येईल असे सांगितले. जिल्हाप्रमुख महेश नळगे यांनी क्रिकेट स्पर्धेच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता जोपासली जाते असे सांगून खेळामुळे आरोग्य चांगले राहते त्यामुळे खेळ भावनेतून खेळ खेळावेत असे आवाहन केले. कार्यक्रमाचे आयोजक तालुकाप्रमुख तथा नगरसेवक प्रदीप बोराडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, वाढदिवस असो किंवा क्रिकेट चषक स्पर्धा आयोजन कमिटीचे सर्व सदस्य प्रचंड मेहनत घेतात. सर्व खेळाडूंनी क्रिकेट स्पर्धा यशस्वीपणे पार पाडाव्यात असे सांगितले.

यावेळी युवा नेते सुरेश पवार, अनंता वैद्य, अरुण वाघमारे यांनी मनोगत व्यक्त केले. या स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे, द्वितीय अनंता वैद्य, तृतीय शाम टाके, चतुर्थ इंजि. राहुल वानखेडे, पाचवे निलेश जोजारे, मॅन ऑफ द मॅच रवी काळे, मॅन ऑफ द सिरीज गणेश गणगे, उत्कृष्ट फलंदाज ट्रॉफी राजेश पवार, उत्कृष्ट गोलंदाज संदीप ढेंगळे, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक डॉ. स्वप्नील वायाळ, समालोचक सन्मानचिन्ह कृष्णा हेलसकर यांनी जाहीर केले. रफिक भाई यांनी ग्राउंड उपलब्ध करून दिले तर क्रिकेट चषकाचे समालोचक कय्युम कुरेशी, शेख परवेज, विठ्ठल बोराडे हे राहणार आहेत. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी आयोजन कमिटीचे रवी काळे, संजय बोराडे, इम्रान पठाण, राहुल बोराडे, सचिन चव्हाळ, शेख ईल्लू, अजिंक्य गोरे, जुनेद पठाण, पंकज राठोड, दिनेश अंभोरे, शेख रियाज, रामेश्वर बोराडे, शेख एहसान, राजा चव्हाण, संदीप ढेंगळे, तानाजी मोरे, अविनाश जाधव, विष्णू वरकड, इमरान बागवान, सोहेल पठाण परिश्रम घेत आहेत. तालुकाप्रमुख तथा नगरसेवक प्रदीप बोराडे क्रिकेट चषक स्पर्धेत दहा संघांनी सहभाग घेतला आहे.

# पात्रुडजवळ ३३ किलो गांजासह आरोपी ताब्यात

## स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपीसह केले वाहन जप्त

माजलगाव । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक बीड यांनी बीड जिल्हामध्ये अंमली पदार्थ विक्री व साठवणुक करणाऱ्या ईसमांची माहीती काढून त्याचेवर कारवाई करण्याचे आदेशीत केले होते.त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की,दिनांक २३ जानेवारी शुक्रवार रोजी एका बजाज मोटार सायकलवर अज्ञात ईसम गांज्याची विक्री करण्यासाठी पात्रुड ता.माजलगांव येथे घेवुन जात आहे, मिळालेल्या बातमीवरुन



पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे यांचे पथकाने मौजे पात्रुड येथे सापळा रचण्यात आला व वरील वर्णनाची संशयीत दुचाकी येताच पथकाने दुचाकी चालकास जागीच पकडण्यात आले. त्याचेकडे असलेल्या सॅक मध्ये पाहणी केली असता जवळपास एकुण ३३ किलो गांज्या मिळुन आला.त्यास त्याचे नांव विचारले असता त्याने त्याचे नांव सय्यद अत्तार रेहेमान सय्यद नौमान,वय ३५ वर्ष, रा परळी जि.बीड असे सांगीतले. मिळुन आलेल्या गांज्याची जागीच सविस्तर पंचनामा करुन तपास कामी ताब्यात घेतला असुन एकुण ७,४६,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे. गंज्याची वाहतुक करण्यासाठी वापरलेली दुचाकी देखील जप्त करण्यात आली आहे. आरोपी विरुदध पोलीस ठाणे माजलगांव ग्रामीण मध्ये गुर.नं २७/२०२६ कलम ८ सि, २० बी गुंगीकारक औषधीद्रव्य आणी मनोव्यापारावर परीमान करणारे पदार्थ अधि.१९८५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.पुढील गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ हे करीत आहेत.

पोलीस अधीक्षक कार्यालय,बीड येथे अंमली पदार्थ विरुध्द कारवाई करण्यासाठी स्वतंत्र एन.डी.पी.एस. कक्ष ( अंमली पदार्थ विरोधी कक्ष) स्थापन करण्यात आले असुन त्याचा हेल्पलाईन क्रमांक ९२७०२४३२०० असा आहे. तरी सर्व जनतेस बीड जिल्हा पोलीस दलातर्फे आवाहन करण्यात येते की,आपल्या परीसरात कोठेही चोरुन लपुन अंमली पान ३ वर

# पोलीस स्टेशनच्या हाकेच्या अंतरावरून दागिने लंपास !

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी शहरात चोरीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असून चोरट्यांनी पोलिस प्रशासनालाच कडवे आव्हान दिले आहे. काल रात्री न्यायालयाच्या जवळ, पोलीस स्टेशनच्या हाकेच्या अंतरावर एका महिलेच्या दुचाकीला धडक देत तिच्या गळ्यातील सोन्याचे दागिने तोडून चोरटे पसार झाले. शहरातील मुख्य चौकात सीसीटीव्ही कॅमेरे असतानाही ही घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यापूर्वी बस स्थानक परिसरात दुकाने फोडणे व प्रवाशांचे दागिने चोरीस जाण्याच्या घटनाही घडल्या आहेत. त्यामुळे पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

**आष्टीत चोरट्यांचे पोलिसांना थेट आव्हान**

आष्टी शहरात चोरीच्या घटनांनी अक्षरशः डोके वर काढले असून चोरट्यांनी थेट पोलिस यंत्रणेलाच आव्हान दिल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. काल रात्री न्यायालयाच्या अगदी जवळ व पोलीस स्टेशनच्या हाकेच्या अंतरावर एका महिलेच्या दुचाकीला धडक देत तिच्या गळ्यातील सोन्याचे दागिने तोडून अज्ञात चोरट्यांनी पलायन केले. विशेष म्हणजे हा संपूर्ण परिसर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या निगराणीखाली असतानाही चोरटे निर्धास्तपणे फरार झाले.

गेल्या काही दिवसांपूर्वी आष्टी बस स्थानकाच्या लगत असलेल्या मोबाईल शॉपी व शिलाई मशीन दुकानांचे वरचे पत्रे फोडून चोरी करण्यात आली होती. त्यानंतर बस स्थानक परिसरात प्रवाशांचे दागिने चोरीस जाण्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. सतत घडणाऱ्या या प्रकारांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, रात्रीची पोलीस गस्त वाढवावी, संशयितांवर कठोर कारवाई करावी व सीसीटीव्हीच्या आधारे आरोपींचा तातडीने शोध घ्यावा, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. या वाढत्या गुन्हेगारीमुळे आता आष्टी पोलिसांसमोर मोठे कडवे आव्हान उभे राहिले आहे. आष्टीचे डी वाय एस पी व पी आय यांनी या गोष्टीचे गांभीर्य घेऊन लवकरात लवकर ही चोरटे जेर बंद करावी अशी नागरिकांमधून मागणी होत आहे.

# मराठी भाषेचा अभिमान हीच खरी सांस्कृतिक समृद्धी –न्या.शिंदे

पाटोदा । प्रतिनिधी

मराठी भाषेचा अभिमान हीच खरी सांस्कृतिक समृद्धी असून मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून ती आपल्या संस्कृतीची, न्यायाची आणि समाजबोधाची आत्मा आहे, असे ठाम प्रतिपादन दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर पाटोदा येथील न्यायाधीश मा. एम. ए. शिंदे यांनी केले.

पाटोदा येथील दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर येथे मराठी संवर्धन पंधरवड्यानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी न्यायाधीश मा. एम. ए. शिंदे होते. व्यासपीठावर पाटोदा वकील संघाचे




अध्यक्ष ड. बी. आर. लवुळ यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच वसंतदादा पाटील महाविद्यालय, पाटोदा येथील मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. आर. बी. धायगुडे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रास्ताविक व सूत्रसंचालन एम. ए. पाठक यांनी केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात न्यायाधीश एम. ए. शिंदे यांनी मराठी भाषेचे ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि न्यायव्यवस्थेतील महत्त्व अत्यंत प्रभावी शब्दांत विशद केले.

संत ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून सामान्य माणसाला तत्त्वज्ञानाची दारे खुली केली, तर संत तुकोबारायांनी अभंगांच्या माध्यमातून समाजाला सत्य, नीती आणि भक्तीचा मार्ग दाखवला. हीच मराठी भाषा आजही समाजाला घडविण्याचे काम करत आहे, असे त्यांनी नमूद केले. न्यायालयीन व्यवहारात मराठीचा अधिकाधिक वापर होणे गरजेचे असल्याचे सांगत पान ३ वर

# मनोहर भवर व दिपक ससे यांची सीआयएसएफ पदी निवड, आ. सुरेश धस यांच्या हस्ते सत्कार

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील मतदारसंघातील बीड सांगवी येथील रहिवासी शेतकरी बांधवांचा मनोहर अंबादास भवर यांची सी आय य एस एफ पदी निवड झाल्याबद्दल आष्टी मतदारसंघातील आमदार श्री सुरेश आण्णा धस यांच्या हस्ते मनोहर भवर व दिपक ससे यांचा सत्कार व सन्मान करण्यात आला आहे.

बीड सांगवी येथील शेतकरी अंबादास भवर यांचा मुलगा मनोहर भवर हा मुलगा शांत संयमी आणि हुशार मुलगा आष्टी येथील स्व. रामचंद्र धस दादा यांच्या तालीम पैलवान सराव करत आहे.आष्टी तालुक्यातील ग्रामीण भागातील डोंगराळ भागात बीड सांगवी युवक मनोहर भवर यांनी आपल्या जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर भारतीय सैन्य दलातील सीआय एस एफ पदी निवड मिळवुन यश संपादन केले आहे त्याचा यश कौतुक होत आहे त्या यश बद्दल आ. सुरेश आण्णा धस.बीड सांगवी सरपंच नंदकिशोर



करांडे,श्रीहरी पुरी महाराज ग्रामसेवक,सेवा सोसायटी चेअरमन सुभाष तात्या गणगे माजी सरपंच बबनराव करांडे आ.सुरेश आण्णा धस यांचे स्वीय सहायक विकास तात्या साळवे ,माजी उपसरपंच रंजित ढोबळे , माजी उपसरपंच संदिप करांडे, संपत ढोबळे, माजी उपसरपंच सोमनाथ घुले, माजी उपसरपंच सदाशिव गणगे,विजय डुकरे, विठ्ठल नरवडे, गोकुळ नरवडे, संतोष नरवडे,ललेश नरवडे,गोरख नरवडे, महादेव चव्हाण, कृष्णा पाणतावणे,ह.भ. प जालीधर नरवडे.ह.भ.प.बाबासाहेब आणा नरवडे,ह.भ.प उत्तम देवकर, रामभाऊ गणगे, बापुराव गणगे, घनश्याम नरवडे,हिराजी बावणे, विठ्ठल शेळके, विठ्ठल कणसे ,रामा करडुळे,भरत आगवान,डिगाबार नरवडे, पप्पु ढोबळे, रितेश पाणतावणे, दिपक कासवा, धन्या टोणपे, बांबु करांडे, विशाल करांडे, दादा साळवे,आरेफ सय्यद,जाफर शेख, विजय करांडे, महादेव घुले, महादेव करांडे, संतोष बावणे, महादेव शेळके, राजाभाऊ चव्हाण, आदि उपस्थित होते मनोहर भवर व दिपक ससे यांचा यश मुळे युवकांना प्रेरणा देणारे ठरणार आहे तर त्याचा पुढील कार्यासाठी सर्वत्र शुभेच्छा व्यक्त करणाऱ्यांत आला आहे

# दोन दिवसांपासून बेपत्ता संकेतचा मृतदेह बिंदुसरा धरणाच्या पाण्यात

**बीड । प्रतिनिधी**

**मागील तीन दिवसांपासून बेपत्ता असलेल्या एका २३ वर्षीय तरुणाचा मृतदेह धरणाच्या पाण्यात आढळून आल्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. संकेत तुकाराम नवले (वय २३, रा. पाली, ता. बीड) असं मृत तरुणाचं नाव असून संकेत नवले हा दोन दिवसांपूर्वी आपल्या घरातून काही सांगून बाहेर पडला होता.**

संकेतचा शोध घेत असताना बिंदुसरा धरणाच्या काठावर त्याचे कपडे आणि चप्पल आढळून आली होती. यामुळे काहीतरी अघटीत घडल्याची शक्यता ग्रामस्थांनी आणि कुटुंबीयांनी व्यक्त केली होती. त्या दृष्टीने गावकऱ्यांनी आणि प्रशासनाने परिसरात शोधमोहीम तीव्र केली. स्थानिक तरुणांनी आणि प्रशासकीय यंत्रणेने पाण्यात शोध घेण्याचा प्रयत्न केला, मात्र कालपर्यंत यश आले नव्हते. अखेर आज शनिवारी सकाळी संकेतचा मृतदेह तलावाच्या पाण्यात तरंगताना आढळून आला. घटनेची माहिती मिळताच बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मृतदेह पाण्याबाहेर काढून पंचनामा केला आहे. त्यानंतर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी बीड येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. संकेतने हे टोकाचे पाऊल का उचलले? त्याच्या आत्महत्येचं नेमकं कारण काय? याचा तपास आता पोलिसांकडून केला जात आहे.

# शिनगारे हल्ला प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करा – अनुरथ वीर

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील नाथापूर येथे सामाजिक कार्यकर्ते तथा रिपाई चे सर्कल प्रमुख सतीश शिनगारे यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा निषेध करून या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करा अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे युवक जिल्हाध्यक्ष अनुरथ वीर यांनी केली.



नाथापूर येथील सामाजिक कार्यकर्ते तथा सर्कल प्रमुख सतीश शिनगारे यांना जुनावाद मिटून घेण्यासाठी बोलवून त्यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला. एखाद्या व्यक्तीला अचानक मारहाण करून दुखापत करण्याइतपत आरोपीचे धाडस कसे होते. हा महत्त्वाचा प्रश्न असून अल्पसंख्याक आणि दलित समाजावरच असे प्रकार जिल्ह्यात का घडतात असा प्रश्न उपस्थित करून सतीश शिनगारे यांच्यावर केलेल्या हल्ल्याचा वंचित बहुजन आघाडीने तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला व या हल्ला प्रकरणातील मुख्य आरोपी व हल्ला करणारे यांना पिंपळनेर पोलिसांनी त्वरित अटक करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे युवक जिल्हाध्यक्ष अनुरथ वीर यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला.

# आष्टी –ब्रह्मगाव– मुगगाव रस्ता ७० लाखाचा अंदाजपत्रक मात्र सव्वा कोटीचे ?

पाटोदा । प्रतिनिधी

रामा –५७ पासून ब्रह्मगाव मुगाव प्रजिमा–३ वर सावरगाव घाट रस्ता प्रजिमा–८ किमी ९/०० ते ११/०० मध्ये संरक्षण भिंत बांधणे व क्रश बॅरियर बसविणे ई–निविदा दि. २३/६/२०२५ ते ३०/६/२०२५ या कालावधीत भरण्यात आलेली होती. घाट सेक्शन अंदाजे दोन किमी अंतर असेल तर एक किलोमीटर संरक्षण भिंत अंदाजे १०० ब्रास असेल तर मटेरियल मजुरीसह २० हजार रुपये ब्रास धरले तरी साधारण संरक्षण भिंत २० ते ३० लाखात काम पूर्ण होऊ शकते राहिलेला एक किमी अंतरात क्रश बॅरियर ८० ते ८५ लाखाच्या आहे का हे संशयास्पद आहे ? मग अशा पद्धतीचे अंदाजपत्रके बनवताना नेमके कोण बनवतो कशा पद्धतीने बनवले जातात याची चौकशी होणे गरजेचे आहे वरील कामाची विभागीय स्तरीय चौकशी होणे खूप गरजेचे आहे हा घाट सेक्शन तीर्थक्षेत्र रस्ता असल्याने या रस्त्यावर वारंवार मोठ्या प्रमाणात बोगस कामे करण्याचा यापूर्वी प्रयत्न झालेला आहे यापूर्वीही या रस्ता कामावर मोठ्या प्रमाणात बोगस बिले उचलण्याचा प्रकार झालेला आहे या सर्व गोष्टीकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे नेमके सामाजिक कार्यकर्ते नेते या गोष्टीकडे डोळे झाक आर्थिक देवाणघेवाणीतून तर करत नाहीत ना हे न उलगडणारे कोडे आहे ? यापूर्वी बांधकाम विभागाच्या बोगस कामाच्या अनेक तक्रारी झालेले आहेत याकडे पालकमंत्री गांभीर्याने लक्ष देतील का वरील कामाची सखोल चौकशी व्हावी अशी जनतेतून मागणी आहे.

## ओंकार उपरे यांना मातृशोक

बीड । प्रतिनिधी

येथील प्रसिद्ध कापडाचे व्यापारी ओंकार चंद्रकांत उपरे विजय उपरे यांच्या मातोश्री



सौभाग्यवती पुष्पाताई चंद्रकांत उपरे यांचे अल्पशा आजाराने त्यांच्या राहत्या घरी दुःखद निधन झाले मृत्यू समयी ६८ वय होते. त्यांच्या पश्चात मुलं मुली नातवंड अशा मोठ्या परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी दिनांक २५ रविवारी आज अमरधाम स्मशानभूमी येथे होणार आहे.

# नगर परिषदेचा वसुली विभाग तळमजल्यावर घ्या –खुर्शीद आलम

## शिष्टमंडळाला मुख्याधिकारी यांचे आश्वासन

बीड । प्रतिनिधी

बीड नगर परिषदेचे वसुली तिसऱ्या तळमजल्यावर असल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना त्रास होत आहेत म्हणून बीड नगरपरिषदेचे गटनेते खुर्शीद आलम यांनी नगरसेवका आणि सर्वसामान्य नागरिकां सह मुख्याधिकारी फडसे साहेब आणि उपनगराध्यक्ष विनोद मुळूक यांची भेट घेऊन निवेदन दिले आहे, निवेदनात म्हटले आहे बीड नगर परिषदेचे वसुली विभाग हे तीसऱ्या मजल्यावर असून सदरील



विभागात कर वसुली भरली व घेतली जाते तसेच नामांतराची कामे पि.टी.आर. व इतर कामे तीसऱ्या मजल्यावर होतात. संबंधीत कामासाठी येणाऱ्या करदात्यांमध्ये पान ३ वर

# घाटनांदूर येथे जलद रेल्वेला थांबा द्या

## दक्षिण मध्य रेल्वेच्या विभागीय व्यवस्थापकाकडे सरपंच व ग्रामस्थांची मागणी

घाटनांदूर । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील सर्वात मोठ्या घाटनांदूर रेल्वेस्थानकावर नांदेड–बेंगलोर संभाजीनगर–गुटूर नांदेड–पनवेल या जलद रेल्वेला थांबा देण्यासाठी दक्षिण मध्य रेल्वेच्या सिकिंद्राबाद विभागीय व्यवस्थापक ए डि आर एम यांच्याकडे सरपंच व ग्रामस्थांची मागणी निवेदनाद्वारे केली आहे अंबाजोगाई तालुक्यात सर्वात मोठी बाजारपेठ असलेल्या घाटनांदूर येथे तालुक्यातील सर्वात




मोठे निजामकालीन एकमेव रेल्वेस्थानक आहे. बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई व केज तालुक्यातील व लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातील रेल्वे प्रवाशांना सोयीचे व जवळचे रेल्वेस्थानक आहे. या रेल्वे मार्गावरून दक्षितेतील राज्यातील प्रमुख शहराला व परभणी नांदेड संभाजीनगर पूर्णा अमरावती नागपूर व दक्षिण महाराष्ट्रातील बार्शी पंढरपूर मिरज सांगली कोल्हापूर जाण्यासाठी पान ३ वर

# राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये बारावी विज्ञान प्रात्यक्षिक परीक्षांना सुरुवात



किल्ले धारूर । प्रतिनिधी

येथील राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये दिनांक २३ जानेवारी पासून इयत्ता बारावी विज्ञान शाखेच्या प्रात्यक्षिक परीक्षांना सुरुवात झाली आहे. फिजिक्स, केमिस्ट्री व बायोलॉजी या विज्ञान विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार शांततेत व शिस्तबद्ध वातावरणात पार पडत आहेत. या प्रात्यक्षिक परीक्षांची पाहणी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी केली. परीक्षेच्या दरम्यान प्रयोगशाळेतील सुविधा, विद्यार्थ्यांची तयारी, तसेच परीक्षेचे नियोजन याबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा. सिद्धेश्वर काळे, प्रा. संदीप गायकवाड, प्रा. धनराज सोळंके व प्रा. बुट्टे सर यांनी विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा अतिशय सुयोग्य, शिस्तबद्ध व मार्गदर्शक पद्धतीने घेत आहेत, विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी आवश्यक त्या सूचना व सहकार्य शिक्षकांकडून करण्यात आले. महाविद्यालय प्रशासनाने प्रात्यक्षिक परीक्षेसाठी आवश्यक असलेल्या सर्व सोयी–सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे विद्यार्थी आत्मविश्वासाने परीक्षा देताना दिसून आले. या परीक्षांमुळे विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष ज्ञानाचा व कौशल्यांचा योग्य आढावा घेतला जात असल्याचे मत प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी व्यक्त केले.

# बाळासाहेबांनी मराठी माणसाला ताकद देण्याचे काम केले–आ. प्रकाश सोळंके



माजलगाव । प्रतिनिधी

हिंदुरुदय सम्राट शिवसेनाप्रमुख कैलासवासी बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी माणसाचे मोठे संघटन तयार करून त्यांना ताकद देण्याचे काम केले आहे आणि राज्यात आज जे युतीचे सरकार आहे ते ठाकरे मुळेच असल्याचे सांगत जन्म शताब्दी वर्षानिमित्त बाळासाहेबांचे स्मारक माजलगावात उभारणार असल्याचे मत माजलगाव चे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी व्यक्त केले आहे.

शिवसेना युवा सेना यांच्या वतीने माजलगावात चुन्मा चौक येथे हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी आमदार सोळंके बोलत होते.

जयंतीनिमित्त शिवसेनेच्या वतीने माजलगाव पान ३ वर

# थेटेगव्हाण आश्रम शाळेतील योग शिबिरास भेट

वडवणी । प्रतिनिधी

शासकीय माध्यमिक आश्रम शाळा थेटेगव्हाण तालुका धारूर जिल्हा बीड या शाळेमध्ये,त्रिमासिक योग शिबिराचे आयोजन आदिवासी विकास विभाग छत्रपती संभाजीनगर व बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित मांडवा तालुका वाशी जिल्हा धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारीश्रीमती चेतना मोरे मॅडम, सहाय्यक प्रकल्पाधिकारी डॉ.उद्धव वायाळ सर,शिक्षण विस्तार अधिकारी श्री गजानन बनसोडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली व ज्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीमध्ये शिबिराचे



उद्घाटन झाले असे आदिवासी निरीक्षक श्री कायदे साहेब यांनी आज

दिनांक २१/११/२०२५ पासून सुरू असलेल्या योगी शिबिरास भेट दिली. विद्यार्थ्यांकडून योग शिबिरामध्ये आतापर्यंत झालेल्या योगासने यांचे प्रात्यक्षिक घेऊन,याची पडताळणी करून नियमित योगासने केल्याने माणसाचे शरीर तंदुरुस्त राहून. प्रतिकारशक्ती,एकाग्रता वाढते मन, चित्त शुद्ध होऊन चांगले विचार करण्याची क्षमता वाढते. एकूणच शरीराचे सर्वांगीण आरोग्य सुधारून निरोगी पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# सहकारी बँकांचे मूल्यांकन केवळ आकडेवारीत नको - दीपक तावरे

**पुणे । प्रतिनिधी**

**नागरी सहकारी बँकांचे मूल्यांकन करताना ते केवळ आकडेवारीत करणे योग्य नाही. सहकारात बँकेचे मूल्यांकन हे सामाजिक कामात देखील करायला हवे, अशी अपेक्षा राज्याचे सहकार आयुक्त व सहकारी संस्थांचे निबंधक दीपक तावरे यांनी येथे व्यक्त केली. सुरुवातीला पुणे पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेची ओळख ही रिक्षावाल्यांची बँक अशी होती. आजही विविध कार्यांद्वारे पुणे पीपल्स बँकेचा सामाजिक दृष्टिकोन इतरांसाठी प्रेरणादायी असल्याचे ते म्हणाले.**

पुणे पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक ही अमृत महोत्सवी वर्षात (७५) पदार्पण करीत आहे. त्यानिमित्ताने गणेश कला क्रीडा रंगमंच येथे शुक्रवारी (दि. २३) आयोजित विशेष कार्यक्रमात अमृत महोत्सवानिमित्त बोधचिन्ह अनावरण आणि पुणे पीपल्स



पुरस्कार प्रदान सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी भारतीय रिझर्व्ह बँकेचे सरव्यवस्थापक संजयकुमार, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक व ज्येष्ठ बँकिंग तज्ज्ञ विद्याधर अनास्कर, पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनचे अध्यक्ष नीलेश ढमढेरे, राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणाचे सचिव अशोक गाडे, सहकारी संस्थांचे पुणे विभागीय सहनिबंधक योगीराज सुर्वे यांच्यासह पुणे पीपल्स बँकेचे अध्यक्ष श्रीधर गायकवाड, उपाध्यक्ष बिपीनकुमार शहा, व्यवस्थापकीय समिती अध्यक्ष ड. सुभाष मोहिते, संचालक सीए जनार्दन रणदिवे यांच्यासह बँकेचे अन्य संचालक आदी उपस्थित होते.मनोरुग्ण महिलांसाठी अजोड कार्य करणार्या अहिल्यानगर येथील माऊली सेवा प्रतिष्ठानचे संस्थापक डॉ. राजेंद्र धामणे व डॉ. सुचेता धामणे यांना पुणे पीपल्स पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. रुपये एक लाख एक हजाराचा धनादेश, पुणेरी पगडी, शाल, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

डॉ. पराग काळकर म्हणाले, जीवनात जे जे मिळेल ते समाजापर्यंत नेण्याचा प्रयत्न प्रत्येकाने करायला हवा. डॉ. धामणे दांपत्याने हे प्रत्यक्ष कृतीत उतरवले आहे. बँकेने त्यांना पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. पुणे पीपल्स बँकेचे अध्यक्ष श्रीधर गायकवाड म्हणाले, मार्च २०२६ अखेर किमान ५०० कोटी रुपये व्यवसायवाढीचे उद्दिष्ट असून, मार्च २०२७ पर्यंत व्यवसायाचे चार हजार कोटींचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. बँकेचे व्यवस्थापकीय समिती अध्यक्ष ड. सुभाष मोहिते यांनी मार्गदर्शन केले.

# पत्नीचे मित्रासोबत अनैतिक संबंधांचा संशय, पतीने काढला काटा

पुणे : मित्राबरोबर अनैतिक संबंध असल्याच्या संशयातून पतीने महिलेवर चाकूने वार करून तिचा खून केला. ही घटना अहिल्यानगर रस्त्यावरील वाडेबोल्हाई परिसरात घडली. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली आहे.

नम्रता शैलेंद्र व्हटकर (वय १९) असे खून




झालेल्या महिलेचे नाव आहे, तर शैलेंद्र प्रकाश व्हटकर (वय ३०, रा. बकोरी, ता. हवेली) याला अटक करण्यात आली. याबाबत शाहरुख दस्तगीर पठाण (वय २३, रा. बालाजी सोसायटी, शिरसवडी, वाडेबोल्हाई) यांनी लोणीकंद पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, फिर्यादी शाहरुख पठाण आणि नम्रता व्हटकर दोन-तीन महिन्यांपासून एकत्र राहताहेत. नम्रता आणि पठाण हे नगर रस्त्यावरील एका खासगी कंपनीत कामाला होते. तेथे दोघांची ओळख झाली. दोन वर्षांपूर्वी नम्रताचा शैलेंद्र व्हटकरशी विवाह झाला होता. नम्रता आणि पठाण यांच्यात अनैतिक संबंध असल्याचा संशय शैलेंद्रला होता. त्यानंतर दोघांमध्ये वाद सुरू झाले. काही महिन्यांपूर्वी नम्रता शैलेंद्रशी भांडण करून पठाणकडे राहण्यास आली होती. विवाहात दिलेले नम्रताचे सोन्याचे दागिने शैलेंद्रकडे होते. तिने त्याच्याकडे दागिने परत करण्याची मागणी केली होती. गुरुवारी (२२ जानेवारी) पठाण कामानिमित्त शिरूर येथे गेला होता. रात्री ८ वाजता घरी परतला, तेव्हा शैलेंद्रला दागिने परत करण्यास सांगितले आहे, असे तिने पठाणला सांगितले. त्यानंतर शैलेंद्रच्या मोबाइलवर त्यांनी संपर्क साधला.

नम्रता आणि पठाण यांना शैलेंद्रने नगर रस्त्यावरील वाडेबोल्हाई मंदिराजवळ बोलावले. त्यावेळी रात्रीचे साडेनऊ वाजले होते. पठाणचा मित्र हरीश कोळपे हा देखील तेथे आला होता. शैलेंद्रने नम्रताला फोन करून जोगेश्वरी हायस्कूलजवळ बोलावले. नम्रता पठाणची दुचाकी घेऊन तेथे गेली. दोघांमध्ये तेथे वाद झाले. वादातून शैलेंद्रने नम्रतावर चाकूने वार केले.

नम्रताचा ओरडण्याचा आवाज पठाणने ऐकला. पठाण आणि त्याच्या मित्राने नम्रताला उपचारासाठी नजीकच्या रुग्णालयात दाखल केले. परंतु डॉक्टरांनी तपासून तिला मृत घोषित केले. या घटनेची माहिती मिळताच पोलिस उपायुक्त सोमय मुंडे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक सर्जेराव कुंभार यांनी घटनास्थळी भेट दिली. पसार झालेल्या शैलेंद्रला अटक करण्यात आली. गुन्हे शाखेच्या पोलिस निरीक्षक खेडकर तपास करत आहेत.

# जिल्हा परिषद निवडणुकीसाठी मतदानयंत्रांची उपलब्धता चौपट

पुणे । प्रतिनिधी

नगरपरिषद आणि महापालिका निवडणुकांदरम्यान अनेक ठिकाणी मतदानयंत्रे बंद पडल्याने गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी मतदानयंत्रांची उपलब्धता दोनपटऐवजी चारपट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी जिल्ह्यात एकूण ३ हजार ६०५ मतदान केंद्रे असून, यासाठी १४ हजारांहून अधिक मतदान यंत्रे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे.

नगरपरिषद व त्यानंतर झालेल्या महापालिका



निवडणुकांमध्ये ईव्हीएम व कंट्रोल युनिट बंद पडण्याच्या अनेक घटना घडल्या होत्या. त्यामुळे अनेक मतदान केंद्रांवर अर्धा तास ते एक तास मतदान प्रक्रिया खोळंबली होती. यंत्रांची उपलब्धता कमी असल्याने तातडीने यंत्रे बदलण्यासाठी मोठा वेळ लागत होता. परिणामी, मतदान केंद्रांवर मतदारांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. सायंकाळी साडेपाच वाजल्यानंतरही अनेक ठिकाणी मतदान केंद्रांवर रांगा असल्याचे चित्र दिसून आले होते. या गंभीर बाबीची दखल घेत राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद निवडणुकीसाठी मतदान यंत्रांची उपलब्धता चारपटीने वाढविण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या पूर्वीच्या निर्देशानुसार मतदान केंद्रांच्या दुपटीहून अधिक यंत्रे उपलब्ध करून देण्यात आली होती. त्यानुसार ३ हजार ६०५ मतदान केंद्रांसाठी ७ हजार ९३१ मतदानयंत्रे व ३ हजार ९६६ कंट्रोल युनिट देण्यात आली होती. मात्र मतदान प्रक्रियेदरम्यान यंत्रे किंवा कंट्रोल युनिट बंद पडल्यास तातडीने बदल करता यावा, यासाठी आता ३ हजार ६०५ मतदान केंद्रांसाठी १४ हजार ४० मतदानयंत्रे व ५ हजार ८१३ कंट्रोल युनिट उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# पुण्यातील महापौर निवडणुकीचा मुहूर्त ठरला; ६ फेब्रुवारीला विशेष सभेचे आयोजन

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील अन्य महानगरपालिकांमध्ये अद्याप सत्तास्थापनेचा तिढा कायम असताना पुण्यात महापौर बसवण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. येत्या ६ फेब्रुवारीला होणार पुण्याच्या महापौर आणि उपमहापौर पदाची निवड होणार आहे. पुण्याचा महापौर, उपमहापौर आणि स्थायी समितीचा (डीरपवळपस ऊेाळीींशश) अध्यक्ष निवडण्यासाठी ६ फेब्रुवारीला विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे. महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांच्या आदेशानुसार ही सभा घेण्यात येणार आहे. ६ फेब्रुवारीला सकाळी ११ वाजता होणाऱ्या पालिकेच्या या सर्वसाधारण सभेत महापौर आणि उपमहापौरपदाची निवड करण्यात येणार आहे. पुणे महापालिकेच्या १६५ जागांपैकी ११९ जागी भाजपचे नगरसेवक निवडून आलेत. त्यामुळे महापौर आणि उपमहापौर पदासाठी भाजपकडे स्पष्ट बहुमत आहे. त्यामुळे विरोधी पक्षांकडून महापौर आणि उपमहापौर पदासाठी उमेदवार उभे केले जातात की, या निवडी बिनविरोध होतात, याकडे सगळ्यांचं लक्ष असणार आहे.




दरम्यान, नव्या महापौराच्या स्वागतासाठी पुण्यातील महापौर बंगला नव्या महापौरासाठी सज्ज होत आहे. राज्यात २०२२ नंतर महानगरपालिकेच्या निवडणुका झाल्या नाहीत, त्यामुळे नवा महापौरही नाही. त्यामुळे आता नव्या महापौरासाठी या बंगल्यात रंगकाम अन् फर्निचरचं काम सुरु करण्यात आलं आहे. या बंगल्यानं पुणं बदलताना पाहिलंय. अनेक नवे निर्णय स्विकारताना पाहिलंय. पुण्याच्या बदलत्या रुपाचा हा बंगला साक्षीदार आहे, कारण अनेक महत्वाचे निर्णय सर्वात आधी याच बंगल्यात विचारासाठी घेतले गेले आहेत. पुण्यात यंदा महिला राज असणार आहे. महापौर पद कोणाला मिळेल, पुण्यात देवेंद्र फडणवीस कोणत्या लाडक्या बहिणीला संधी देतात हे काही दिवसांत स्पष्ट होईल आणि पुन्हा एकदा धामधुमीत नवा महापौर या बंगल्यात वास्तव्यास येईल.

महानगरपालिकेतील पक्षनिहाय संख्याबळ

एकूण जागा १६५

भाजप- ११९ शिवसेना -०

ऊबाठा-१ राष्ट्रवादी शरद पवार -३

राष्ट्रवादी अजित पवार -२७ कॉंग्रेस -१५ एमआयएम-० अपक्ष-० इतर -०

# भोर आठवडे बाजारात सोन्याचे बिस्कीट आमिष; ज्येष्ठ महिलेची पोत लंपास

भोर । प्रतिनिधी

१२ तोळ्यांचे सोन्याचे बिस्कीट देण्याच्या आमिषाने ज्येष्ठ महिलेची अडीच तोळ्यांची सोन्याची पोत दोन चोरट्यांनी लंपास केली. भोर शहरातील मंगळवार पेठेतील आठवडे बाजारात मंगळवारी (दि. २०) ही घटना घडली. याप्रकरणी पळसोशी (ता. भोर) येथील अलका वसंत म्हस्के (वय ६५) यांनी भोर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवार पेठेतील आठवडे बाजारात दुपारच्या सुमारास दोन चोरट्यांनी अलका म्हस्के यांच्याशी संवाद साधत, 'आजी, आम्ही तुम्हाला १२ तोळ्यांचे सोन्याचे बिस्कीट देतो. त्या बदल्यात



तुमच्या गळ्यातील पोत द्या,' असे सांगून त्यांना भुलवले. त्यानंतर खोटे, कोणत्यातरी धातूचे बिस्कीट देत त्यांच्या गळ्यातील अडीच तोळे वजनाची, १६० सोन्याचे मनी असलेली तीनपदरी पोत घेऊन ते पसार झाले.

या घटनेत म्हस्के यांचे २ लाख १० हजार रुपये किमतीचे सोने चोरीस गेले आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक अण्णा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार धर्मवीर खांडे करत आहेत. दरम्यान, नागरिकांनी आठवडे बाजार किंवा अन्य ठिकाणी अनोळखी व्यक्तींच्या भूलथापांना बळी पडू नये. संशयास्पद व्यक्ती आढळल्यास तत्काळ भोर पोलिसांशी संपर्क साधावा किंवा जवळच्या ओळखीच्या व्यक्तींना माहिती द्यावी, असेही पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

# ज्येष्ठ लेखिका शुभदा गोगटे यांचे निधन

**पुणे । प्रतिनिधी**

मराठी साहित्यात वेगळा ठसा उमटवणाऱ्या ज्येष्ठ लेखिका शुभदा गोगटे (वय ८२) यांचे शनिवारी (दि.२४) वृद्धापकाळाने



निधन झाले. त्यांच्या पश्चात पती शरद गोगटे, दोन मुली असा परिवार आहे. गोगटे यांनी लेखनाची सुरुवात विज्ञान काल्पनिकतेने केली.

त्यांची पहिल्याच 'यंत्रायणी' या वैज्ञानिक कादंबरीला १९८३ सालचा राज्य सरकारचा साहित्य पुरस्कार मिळाला. त्यांच्या बऱ्याच विज्ञान आणि गूढ कथा प्रसिद्ध झाल्या आहेत. साहित्य अकादमी आणि राष्ट्रीय पुस्तक न्यास यांनी प्रकाशित केलेल्या भारतीय वैज्ञानिक कथांच्या प्रातिनिधिक संग्रहात त्यांच्या विज्ञानकथांचा समावेश आहे. गोगटे यांच्या भारतातील रेल्वे इतिहासाच्या पार्श्वभूमीवर आधारित 'खंडाळ्याच्या घाटासाठी' आणि 'सांधा बदलताना' या दोन कादंबऱ्या गाजल्या. 'खंडाळ्याच्या घाटासाठी' कादंबरीला महाराष्ट्र साहित्य परिषदेचा ह. ना. आपटे पुरस्कार तसेच मृण्मयी पुरस्कार मिळाला. याशिवाय त्यांचे डॉ. जगदीश हिरेमठ यांच्या 'रिव्हरसिंग द हॉर्ट डिसीज' या कार्यक्रमावर आधारित 'हृदयविकार निवारण' हे पुस्तक प्रकाशित झाले.

# टेमघर धरणग्रस्त शेतकऱ्यांचा मोबदला रखडला अधिकाऱ्यांच्या खुर्चीच्या जप्तीचे पुन्हा आदेश

पुणे । प्रतिनिधी

राज्य सरकारकडून निधी न मिळाल्याने टेमघर धरणग्रस्त शेतकऱ्यांना वाढीव मोबदला अद्यापी मिळालेला नाही. याबाबत जिल्हा सत्र न्यायालयाने दोन वेळा आदेश देऊनही मोबदला न दिल्याने न्यायालयाने विशेष भूसंपादन अधिकाऱ्यांच्या खुर्चीच्या जप्तीचे आदेश दुसऱ्यांदा दिले आहेत. न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करत प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी अधिकाऱ्यांच्या खुर्चीची जप्ती करण्याची मागणी केली.

जिल्हा सत्र न्यायालयाने टेमघर धरणग्रस्त शेतकऱ्यांना वाढीव मोबदला देण्याचे आदेश देऊन दोन वर्षे उलटली आहेत. मात्र, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडून अद्याप



मोबदला न दिल्याने न्यायालयाने गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये विशेष भूसंपादन अधिकाऱ्यांच्या मालमत्ता जप्तीचे आदेश दिले होते. त्या वेळी जिल्हा प्रशासनाने जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांशी चर्चा करून ऑक्टोबरपर्यंत मोबदला न्यायालयात जमा करून शेतकऱ्यांना देण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, पाच महिने उलटूनही शेतकऱ्यांना मोबदला मिळालेला नाही.

या प्रकरणात २८ शेतकऱ्यांना सुमारे २३ कोटी ७५ लाख रुपयांचा वाढीव मोबदला मिळणे अपेक्षित आहे. यासाठी जलसंपदा विभागाने राज्य सरकारकडे निधीची मागणी केली आहे. मात्र, निधी न मिळाल्याने शेतकऱ्यांनी पुन्हा न्यायालयात धाव घेतली. त्यानुसार बुधवारी (दि. २१) न्यायालयाने विशेष भूसंपादन अधिकाऱ्यांच्या खुर्चीच्या जप्तीचे आदेश दिले.

# दारूसाठी पैसे न दिल्याने तरुणावर सिमेंटच्या गट्टूने हल्ला

पिंपरी । प्रतिनिधी

दारू पिण्यासाठी पैसे दिले नाहीत, या रागातून तिघांनी मिळून एका तरुणाला आणि त्याच्या नातेवाईकांना सिमेंटच्या गट्टूने मारहाण केली. ही घटना बुधवारी (दि. २१) रात्री चिंचवड येथील गोल्डन चौक परिसरात घडली.

याबाबत साबिरअली मुजीबुल रेहमान मनिहार (१८, रा. विद्यानगर, चिंचवड) यांनी पिंपरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी चेतन सूर्यकांत पात्रे (२१, रा. विद्यानगर, चिंचवड), करण दोढे (१८, रा. विद्यानगर, चिंचवड) आणि लक्ष्या कांबळे (१८, रा. विद्यानगर, चिंचवड) यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला असून, करण दोढे याला अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी मनिहार आपल्या काकांसाठी औषध घेऊन घरी जात असताना आरोपींनी त्यांना अडवून दारूसाठी पैशांची मागणी केली.

पैसे देण्यास नकार दिल्याने लक्ष्या कांबळे याने फिर्यादीच्या कानशिलात मारली आणि सिमेंटचा गट्टू पायावर मारून जखमी केले. इतर आरोपींनीही लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या प्रकाराबाबत फिर्यादीच्या नातेवाईकांनी जाब विचारला असता, आरोपींनी फिर्यादीचे काका आणि चुलत भावांनाही मारहाण केली आणि पुन्हा आल्यास 'मारून टाकू' अशी धमकी दिली. पिंपरी पोलिस तपास करत आहेत.

# पोलिसानेच चोरले १० कोटींचे ड्रग्ज

## शिरूरमधील 'त्या' गॅरेजचालकाने उघडलं गुपित..

पुणे । प्रतिनिधी

पुणे ग्रामीण पोलिसांनी शिरूरमध्ये गॅरेजचालकाकडून जप्त केलेल्या अंमली पदार्थाच्या विक्रीत प्रत्यक्ष पोलीस कर्मचाऱ्याचा हात असल्याची बाब समोर आली आहे. श्रीरामपुरातील एमआयडीसीत जप्त केलेला अल्प्राझोलम हा अंमली पदार्थ या पोलिसाने चोरून परस्पर विक्री केल्याचे दिसते.१८ जानेवारी रोजी शिरूरमधील गॅरेजचालक शादाब रियाज शेख (४१) याच्याकडून एक किलो ५२ ग्रॅम अंमली पदार्थ जप्त केले.



फॉरेन्सिक तपासणीत हा पदार्थ झोपेच्या गोळ्या तयार करण्यासाठी वापरला जाणारा अल्प्राझोलम असल्याचे निष्पन्न झाले.चौकशीत शादाब शेखने अहिल्यानगरच्या अंमली पदार्थ विरोधी विभागातील पोलीस कर्मचारी शामसुंदर गुजरसह अन्य तिघांची नावे घेतली. तांत्रिक तपासात गुजरचा सहभाग निष्पन्न झाल्यानंतर पुणे ग्रामीण पोलिसांनी त्याच्यासह चार आरोपींना अटक केली.

आरोपींकडून आंतरराष्ट्रीय बाजारातील किमंतीनुसार १० कोटी रुपयांहून अधिक किंमतीचा १० किलो ७०० ग्रॅम अल्प्राझोलम जप्त केला. मे २०२५ मध्ये श्रीरामपूर एमआयडीसी परिसरात एका टेम्पोतून १३ कोटी ७५ लाखांचा अल्प्राझोलम जप्त केला होता. हाच मुद्देमाल गुजर याने पदाचा गैरवापर करून चोरल्याचे आता उघड झाले आहे.काही आरोपींनी हा अंमली पदार्थ घरातील गोठ्यात, तर काहींनी शेतात लपवून ठेवल्याचे उघड झाले. पुणे ग्रामीण पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे हा साठा हस्तगत केला. या प्रकरणी शादाब रियाज शेख (रा. शिरूर, पुणे),शामसुंदर गुजर (रा. अहिल्यानगर),ऋषिकेश प्रकाश चित्तर (रा. कुरुंद, ता. पारनेर),महेश गायकवाड (रा. श्रीगोंदा),ज्ञानदेव शिंदे (रा. अहिल्यानगर) यांना अटक केली असून, दुचाकी, कारसह इतर साहित्य जप्त केले आहे.

रक्षक बनला भक्षक

पोलीस अंमलदार शामसुंदर गुजर हा अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेत मुद्देमाल कारकून म्हणून कार्यरत होता. जप्त अंमली पदार्थाची देखरेख व साठवणूक करण्याची जबाबदारी असताना त्यानेच साडेदहा किलो अल्प्राझोलम परस्पर बाहेर काढून आरोपींमार्फत विकल्याचे आढळले. अल्प्राझोलमच्या जागी त्याने मैदा भरुन ठेवला होता. चौकशीत आणखी मोठे मासे अडकण्याची शक्यता आहे.

# महिलेला ४.८२ कोटींचा 'डिजिटल' गंडा! 'मनी लॉंड्रिंग'चा भीतीदायक बनाव रचून फसवणूक

पुणे । प्रतिनिधी

कोंढवा येथील एका महिलेला डिजिटल रेस्टच्या नावाखाली तब्बल ४ कोटी ८२ लाखांचा गंडा घालण्यात आला आहे. सायबर चोरट्यांनी मनी लॉंड्रिंगचा बनाव रचून ही फसवणूक केली आहे. १८ डिसेंबर रोजी सायबर चोरट्यांनी फिर्यादी महिलेला पोलीस अधिकारी असल्याचे भासवून फोन केला. तुमच्या आधार कार्डचा गैरवापर करून विविध राज्यांत बँक खाती उघडली आहेत.




त्यातून मनी लॉंड्रिंगचे व्यवहार झाले आहेत, अशी भीती त्यांना घालण्यात आली. महिलेला तासनतास व्हिडिओ कॉलवर गुंतवून तिला डिजिटल रेस्ट केल्याचा बनाव रचण्यात आला. अटक टाळायची असेल, तर तपासासाठी पैसे जमा करावे लागतील, असे सांगून चोरट्यांनी महिलेकडून वेळोवेळी एकूण ४ कोटी ८२ लाख १४ हजार रुपये विविध बँक खात्यांत वर्ग करून घेतले. इतकी मोठी रक्कम दिल्यानंतर फसवणूक झाल्याचे महिलेच्या लक्षात आले. त्यांनी १९ जानेवारी रोजी सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. सध्या पोलीस तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपींचा शोध घेत आहेत.